मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी

तरुणांचा बुलंद आवाज

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २१२ ■ सोमवार, १२ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# सुरांची 'सम्राज्ञी' आशा भोसले यांचं निधन



**मुंबई :** ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं रविवारी (दि.12) निधन झालं. वयाच्या 92 व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. भारतरत्न आणि 'गानसम्राज्ञी' लता मंगेशकर यांची लहान बहीण असलेल्या आशा भोसले यांना हिंदी सिनेसृष्टीची अष्टपैलू गायिका म्हणून ओळखलं जायचं. शनिवारी (11 एप्रिल) त्यांना हृदयविकाराचा झटका आल्यानंतर ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांच्या निधनानंतर मनोरंजन सृष्टीतील कलाकारांनी प्रतिक्रिया देत आशा भोसले यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. चित्रपट क्षेत्रातील अनेक दिग्गजांनी 'ईटीव्ही भारत'कडं Exclusive प्रतिक्रिया देत आशा भोसले यांच्याबरोबरच्या आठवणींना उजाळा दिला.

**आशा भोसले यांच्या आवाजाची रेंज अद्भुत होती :** "आमच्या कुटुंबाचे आशा भोसले आणि लताजी यांच्याशी घनिष्ठ नातं होतं. पूर्वीच्या काळी ऑर्केस्ट्रा संगीत वाजवत असताना आणि गाण म्हणत असताना मायक्रोफोनच्या सहाय्यानं सर्व रेकॉर्डिंग थेट (लाईव्ह) केलं जायचं. यावेळी आशाजी मला नेहमी आत बोलावून आपल्या हावभावांनी गाणं कसं गायचं? याबद्दल मार्गदर्शन करायच्या. त्यांच्या आजारपणापूर्वी मला त्यांच्याशी बोलता आलं, यासाठी मी कृतज्ञ आहे. त्यांच्या आवाजाची रेंज अद्भुत होती. आशा भोसले नेहमीच स्नेह आणि आदर दाखवायच्या. त्या आणि लताजी माझ्या आजी, शमशाद बेगम यांचा खूप आदर करत असत. अशी माणसं दुर्मिळ असतात. आम्ही त्यांना नेहमीच स्मरणात ठेवू. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो," अशा भावनिक शब्दात ज्येष्ठ अभिनेत्री सायरा बानो यांनी आशा भोसले यांना श्रद्धांजली अर्पण केली.

**आता पंचमजी आणि तुमची पुन्हा भेट होईल :** "आशा भोसलेजी, तुमच्या आत्म्यास शांती लाभो. तिथं कोणतंही युद्ध नाही, कोणतीही वेदना नाही, फक्त संगीत आणि तुम्ही. आता पंचमजी आणि तुमची पुन्हा भेट होईल. वयाच्या 92 व्या वर्षी त्या आम्हाला सोडून गेल्या, पण त्यांनी मागं सोडलेला वारसा अतुलनीय आहे. धाडसी, खंबीर आणि अष्टपैलू गायिका म्हणून त्यांची ओळख होती. त्यांची गाणी आपल्यासोबत कायम राहतील. आम्ही सर्वजण त्यांच्यावर खूप प्रेम करतो. त्यांच्या आठवणी अगणित आहेत. आशा भोसले यांचं वर्णन शब्दांत करणं अशक्य आहे. हे दुःख सहन करण्याची शक्ती त्यांच्या कुटुंबीयांना मिळो," अशा शब्दात पार्श्वगायिका उषा उत्थुप यांनी आशा भोसले यांना श्रद्धांजली अर्पण केली.

**त्या घटनेनंतर आशा भोसले यांनी आयुष्यात खूप काही करून दाखवलं :** "आशा भोसले यांच्यासारखा आवाज कधीच ऐकू आला नाही. मी लहानपणापासून त्यांची गाणी ऐकत आलो आहे. ओ. पी. नय्यर आणि पंचम दा यांच्यासोबतची त्यांची गाणी हे सगळं अविस्मरणीय आहे. त्यांच्या आवाजातील सहजता, खेळकरपणा आणि मखमलीपणाची बरोबरी कोणीही करू शकलं नाही. पंचम दा यांच्या निधनानंतर आशा भोसले पूर्णपणे खचल्या होत्या. परंतु, या दुःखातून त्यांनी स्वतःला सावरलं आणि आयुष्यात खूप काही करून दाखवलं. त्या शिस्तप्रिय होत्या. त्यांनी अनादर किंवा बेशिस्तपणा कधीही सहन केला नाही. आशा भोसले यांनी 92 वर्षांच्या आयुष्यात असंख्य आठवणी आणि एक अमूल्य वारसा मागं ठेवला आहे. जोपर्यंत हे जग अस्तित्वात आहे, तोपर्यंत त्यांचा सुमधुर आवाज आपल्या कानांत घुमत राही," अशा भावनिक शब्दात ज्येष्ठ अभिनेते रझा मुराद यांनी आशा भोसले यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना श्रद्धांजली वाहिली.

**आशा भोसले यांचा आवाज कधीही विसरला जाणार नाही :** "आशा भोसले यांचं निधन ही एक मोठी हानी आहे. त्यांचा सुमधुर, शिस्तबद्ध आणि अद्वितीय आवाज कधीही विसरला जाणार नाही. मी लहानपणापासून त्यांची गाणी ऐकत आलो आहे आणि त्यांनी नेहमीच माझ्यावर कौतुक आणि प्रेमाचा वर्षाव केला आहे," असं सांगत ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांनी श्रद्धांजली आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहिली.

**आपण सर्वजण त्यांना स्मरणात ठेवू :** "आशाताईंनी माझ्या 'जीवलगा' या चित्रपटात गाणं गायलं होतं. मी त्यांची गाणी ऐकत बसायचो. त्या आता आपल्यात नाहीत, पण त्यांच्या आठवणी आणि त्यांचं संगीत आपल्यासोबत कायम राहील. आपण सर्वजण त्यांना स्मरणात ठेवू. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो," असं सांगत अभिनेते, निर्माते आणि दिग्दर्शक महेश कोठारे यांनी आशा भोसले यांना श्रद्धांजली अर्पण केली.

**आवाज कायम जिवंत राहिल :** "आशा भोसले या देशासाठी एक अनमोल ठेवा होत्या. लताजी आणि आशाजी यांच्यासारख्या महान व्यक्ती दुर्मिळ असतात. ती शारीरिकरित्या आपल्यात नसली तरी, त्यांचा आत्मा आणि त्यांचा आवाज कायम जिवंत राहिल. त्यांचं संगीत, त्यांचा विनोद आणि त्यांची शिस्त येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा देत राहील. त्या प्रत्येक परिस्थितीत खंबीर राहिल्या आणि त्यांनी आपल्या देशवासियांना आयुष्यभराचा अनमोल ठेवा दिला. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, अशी आम्ही प्रार्थना करतो," अशी भावना व्यक्त करत पार्श्वगायक कैलाश खेर यांनी आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहिली.

**त्यांच्या पार्थिवाचे आज, दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत कासा ग्रँडे को-ऑप. हाऊसिंग सोसायटी, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई येथे अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. यावेळी मान्यवरांना अंतिम दर्शन घेता येणार आहे. त्यानंतर दुपारी ४.०० वाजता कै. भागोजी कीर हिंदू स्मशानभूमी, प. पू. जांभेकर महाराज पथ, शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.**




## एसआयआर प्रक्रियेतून अचूक मतदार यादीचा निर्धार

# पश्चिम बंगालप्रमाणे महाराष्ट्रातून ५० लाख घुसखोर बांगलादेशी बाद होणार - माजी खासदार किरीट सोमय्या

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** भारतीय निवडणूक आयगाच्या वतीने " विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर)" अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा उद्देश मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करणे हा आहे. या प्रक्रियेदरम्यान मृत, स्थलांतरित, डुप्लिकेट, बेकायदेशीर बांगलादेशी अपात्र मतदारांची नावे वगळण्याचे काम करण्यात येत आहे. या मोहिमेत मोठ्या प्रमाणावर नावे तपासण्यात आली असून पश्चिम बंगालमध्ये सुमारे ९० लाख घुसखोर बांगलादेशींची नावे यादीतून वगळण्यात आली आहेत. त्याच अनुषंगाने महाराष्ट्रातील जवळपास ५० लाख बेकायदेशीर बांगलादेशींची नावे वगळण्याचा आग्रह निवडणूक आयोगाकडे करण्यात येणार असल्याची माहिती भाजपचे ज्येष्ठ नेते माजी खासदार आणि या अभियानाचे प्रदेश संयोजक किरीट सोमेय्या यांनी आज पनवेल येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.यावेळी त्यांच्यासमवेत भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.



तसेच खारघर व आजूबाजूच्या परिसरामध्ये बंगलादेशींनी बेकायदेशीर खुसखोरी केली आहे त्यामुळे याठिकाणी पाहणी करणार असून मुंब्रा कळवा या ठिकाणी खुसखोर बांगलादेशींचा शोध घेणार असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले. भारताचे मूळ नसलेल्या लोकांचे नाव मतदार यादीत आहे पण पूर्ण इतिहासात नाही अशा लोकांचे नाव वगळण्याची प्रकिया देशाच्या अनुषंगाने महत्वाची आहे. त्यानुसार आता २० एप्रिलपासून महाराष्ट्रात एसआयआर मोहीमचे काम सुरु होणार आहे. त्यामुळे घुसखोर मतदार यादीतून बाद होणार आहेत, असेही किरीट सोमय्या यांनी यावेळी स्पष्ट केले. त्यांनी पत्रकारांशी संवाद करताना पुढे सांगितले कि, महाराष्ट्रात लवकरच भारतीय निवडणूक आयोग मार्फत मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेला प्रारंभ होणार आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष राज्यभर संघटनात्मक पातळीवर व्यापक तयारी करत असून, प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट व्हावे यासाठी पक्ष कटिबद्ध असल्याचे किरीट सोमैय्या यांनी यावेळी सांगितले. पक्षांतर्गत स्तरावर या उपक्रमाला "मत शुद्धीकरण अभियान" असे संबोधण्यात आले असून, यामागील उद्देश म्हणजे मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह बनवणे हा आहे. या प्रक्रियेत पात्र नागरिकांची नोंदणी सुनिश्चित करण्याबरोबरच, यादीतील त्रुटी दुरुस्त करणे आणि अपात्र नोंदी वगळणे यावर भर दिला जाणार आहे.

या अनुषंगाने, राज्यातील सुमारे एक लाख मतदान केंद्रांवर पक्षाचे कार्यकर्ते सक्रिय करण्यात येत आहेत. "पन्ना प्रमुख" व्यवस्था बळकट करून प्रत्येक मतदाराशी प्रत्यक्ष संपर्क साधण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. स्थानिक पातळीवर मतदारांना आवश्यक कागदपत्रे, नोंदणी प्रक्रिया आणि पडताळणी याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. एसआयआर उपक्रमांतर्गत सध्याच्या मतदार यादीची२००२ च्या मूळ यादीशी (स्वतः किंवा वारसदाराच्या नावाने) तुलना करण्यात आली असता सुमारे २० टक्के जुळणी आढळून आली. ग्रामीण भागात हे प्रमाण ७० ते ८० टक्क्यांदरम्यान असताना, शहरी भागात ते सुमारे ५० टक्के आहे. या आकडेवारीच्या आधारे मतदार नोंदणी व पडताळणी प्रक्रियेला अधिक गती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. किरिट सोमय्या यांनी नमूद केले की, एसआयआर ही प्रक्रिया पात्र नागरिकांची नोंदणी सुनिश्चित करणारी असून, बेकायदेशीररीत्या समाविष्ट झालेल्या नावांची छाननी करून त्यांना वगळण्यासही मदत करेल. लोकशाही मजबूत करण्यासाठी अचूक आणि विश्वसनीय मतदार यादी ही अत्यावश्यक आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी आपापल्या क्षेत्रात सक्रिय सहभाग नोंदवून प्रत्येक पात्र मतदारापर्यंत पोहोचावे आणि एसआयआर प्रक्रियेला यशस्वी बनवावे, असे आवाहनही किरीट सोमेय्या यांनी यावेळी केले.

# पाकणी येथे १३ एप्रिलपासून अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र राज्य:-राजु शिंदे** : मंठा तालुक्यातील पाकणी गावातील धार्मिक व सांस्कृतिक वातावरण अधिक बळकट करणारा अखंड हरिनाम सप्ताह दि. १३ एप्रिल, सोमवारपासून मोठ्या भक्तिभावाने सुरू होत आहे. या सप्ताहाचे आयोजन ग्रामस्थांच्या सहकार्याने करण्यात आले असून, संपूर्ण गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

या अखंड हरिनाम सप्ताहादरम्यान दररोज हरिनामाचा गजर, भजन-कीर्तन, प्रवचन तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गावातील तसेच परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे. तसेच पाकणी व परिसरातील सर्व भाविक भक्तांनी या सप्ताहात सहभागी होऊन हरिनामाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

सप्ताहाच्या निमित्ताने मंदिर परिसराची स्वच्छता व सजावट करण्यात आली असून,




आकर्षक रोषणाई देखील करण्यात आली आहे. या कार्यक्रमामुळे गावात आध्यात्मिक एकात्मता वाढून समाजात सद्भावना आणि बंधुभाव दृढ होईल, असा विश्वास आयोजक यांनी व्यक्त करण्यात येत आहे.

# जोगेश्वरी पूर्वेत ठेकेदारांचा हलगर्जीपणा; नालेसफाईमुळे नागरिक त्रस्त

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख** : मुंबई शहरात पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नालेसफाईची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा दावा Brihanmumbai Municipal Corporation (BMC) प्रशासनाकडून केला जात असला, तरी प्रत्यक्षात मात्र अनेक ठिकाणी ही कामे केवळ दिखाव्यासाठी होत असल्याचे चित्र समोर येत आहे. रस्त्यालगत असलेल्या छोट्या नाल्यांमधील गाळ व कचरा काढून बाजूला टाकण्यात येतो; मात्र तो त्वरित उचलण्यात येत नसल्याने तोच ओला गाळ पुन्हा नाल्यात वाहून जात आहे. त्यामुळे संपूर्ण साफसफाईचे काम निष्फळ ठरत असून नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

विशेषतः जोगेश्वरी पूर्वेतील महाराज भवन ते ठाकूर नगर या रस्त्यावर



नालेसफाईच्या कामांमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत. या परिसरात नाल्यातून काढलेला गाळ रस्त्याच्या कडेला तसाच टाकून ठेवण्यात येत असून, तो वेळेत उचलला जात नाही. परिणामी, वाहने किंवा वाऱ्यामुळे तोच गाळ पुन्हा नाल्यात परत जात आहे.

स्थानिक रहिवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, सफाई कामगारांकडून नाल्यातील कचरा बाहेर काढला जातो, मात्र तो रस्त्याच्या कडेला तसाच टाकून ठेवला जातो. विशेषतः गाळ ओला असल्याने तो उचलण्यास टाळाटाळ केली जाते. परिणामी, काही तासांतच नाला पुन्हा तुंबलेला दिसतो. या प्रकारामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

नियमांनुसार, नालेसफाई करताना काढलेला गाळ त्वरित उचलून योग्य ठिकाणी विल्हेवाट लावणे आवश्यक असते. यासाठी संबंधित विभागातील अभियंते व अधिकाऱ्यांनी कामावर काटेकोर देखरेख ठेवणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात ठेकेदार व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे कामे अर्धवटच राहतात. यामध्ये ठेकेदारांचा निष्काळजीपणा तसेच संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष स्पष्टपणे दिसून येत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, पावसाळा तोंडावर आला असताना अशा प्रकारच्या निष्काळजीपणामुळे पूरस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नाले वेळेवर व योग्य पद्धतीने साफ न झाल्यास पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यात अडथळे निर्माण होतात, ज्यामुळे रस्त्यांवर पाणी साचणे, वाहतुकीचा खोळंबा होणे आणि नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते.

या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांनी संबंधित प्रशासनाकडे प्रत्यक्षात तात्काळ याकडे लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही करावी, अन्यथा येणाऱ्या पावसाळ्यात नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागेल, असा इशाराही नागरिकांकडून देण्यात येत आहे.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 15 एप्रिल रोजी नागपूर येथील एम्सचा दुसरा दीक्षांत समारोह

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर** : राष्ट्रपती दौपदी मुर्मू या दोन दिवसीय नागपूर दौऱ्यावर येत असून 15 एप्रिल रोजी त्यांच्या मुख्य उपस्थितीत येथील एम्स अर्थात अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थानच्या द्वितीय दीक्षांत समारोहास त्या मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. 15 एप्रिल रोजी सकाळी 11 वाजता एम्स येथील मुख्य सभागृहात हा समारंभ आयोजित करण्यात आला आहे. राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव व मान्यवरांची यावेळी उपस्थिती राहील.

या कार्यक्रमानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या लोक भवन येथे जाणार असून सायंकाळी 4.50 वाजता राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी येथे




मुख्य सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या 78 व्या भारतीय महसूल सेवा बॅचच्या समावर्तन सोहळ्यास मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी, केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाचे अध्यक्ष रवी अग्रवाल, महासंचालक सीबीचेन के मॅथ्यु यांची उपस्थिती राहील.

या कार्यक्रमानंतर त्या लोक भवन येथे मुक्कामी राहणार असून दिनांक 16 एप्रिल रोजी वर्धा येथील सेवाग्राम आश्रमला त्या भेट देणार असून महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या दीक्षांत समारोहास मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहतील. तेथील समारोह आटोपून राष्ट्रपती नागपूर विमानतळ येथून दिल्लीकडे प्रयाण करतील.

**जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व सहपोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन घेतला सुरक्षा आढावा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या नागपूर दौऱ्याच्या निमित्ताने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व सहपोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी प्रत्यक्ष कार्यक्रम स्थळावर भेट देऊन सुरक्षेचा आढावा घेतला. त्यांच्या दौऱ्याच्या निमित्ताने सर्व संबंधित यंत्रणांना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दक्षतेच्या सूचना केल्या.

# जागतिक पार्किन्सन दिनानिमित्त नावीन्यपूर्ण घोषणा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : मुंबईतील जसलोक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरने पार्किन्सन आजार ( चालताना अचानक अडथळा ) मध्ये नाविन्यपूर्ण आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) प्रोजेक्टची घोषणा केली आहे.

पार्किन्सन आजाराने पीडित रुग्णांना अनेकदा चालताना अचानक अडथळा जाणवतो किंवा चालणे सुरू ठेवणे कठीण होते. या स्थितीला रुग्ण त्यांचे पाय जमिनीला चिकटल्यासारखे वाटत असल्याचे सांगतात. यामुळे रुग्ण वारंवार पडतात असे डॉ. परेश दोशी* म्हणाले, "भारतात पार्किन्सन आजाराने पीडित रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे.

जसलोक हॉस्पिटलमधील न्यूरोसर्जरीचे संचालक डॉ. परेश दोशी या उपक्रमाचे नेतृत्व करत आहेत. तसेच, फ्रान्समधील पॅरिस ब्रेन इन्स्टिट्यूटच्या फंक्शनल न्यूरोसर्जरीमधील जागतिक स्तरावर प्रख्यात तज्ज्ञ डॉ. कॅरीन कराची या देखील त्यांच्यासोबत या प्रोजेक्टमध्ये




सामील होतील. जागतिक पार्किन्सन दिनानिमित्त या प्रोजेक्टची अधिकृत ओळख करून दिली जाईल. पॅरिस ब्रेन इन्स्टिट्यूटच्या डॉ. कॅरीन कराची* म्हणाल्या, "प्रोफेसर दोशी यांनी गेल्या ३० वर्षांत संकलित केलेला डेटा जगात अद्वितीय आहे.

पार्किन्सन हा जगभरातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात सामान्य न्यूरोडिजेनेरेटिव्ह आजार आहे आणि भारतात त्याचे प्रमाण वेगाने वाढत आहे. यामुळे या आजारात लवकरात लवकर आणि अचूक उपचार मिळण्यासाठी आधुनिक साधनांची गरज अधोरेखित होत आहे. असे सीईओ जितेंद्र हरियाण* म्हणाले.

# बॅनरबाजी न करता सामाजिक उपक्रमांतून वाढदिवस साजरा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी** : नवी मुंबई परिसरात एक वेगळा आणि समाजासाठी प्रेरणादायी उपक्रम राबवत मा. श्री. दिलीप किसनराव आमले (आपला माणूस, समाज प्रबोधनकार – व्यसनमुक्ती जनजागृती) आणि सौ. संगीताताई दिलीप आमले (अध्यक्षा – त्रिमूर्ती महिला मंडळ, संचालिका – अंकिता मोटार ट्रेनिंग स्कूल, मा. अशासकीय सदस्या – शिधावाटप दक्षता समिती, नवी मुंबई) यांनी आपला वाढदिवस साजरा केला.

वाढदिवसानिमित्त कुठल्याही प्रकारची बॅनरबाजी, जाहिरात किंवा अनावश्यक खर्च न करता समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य देत एक आदर्श निर्माण करण्यात आला. बॅनर व फलकांवर खर्च होणारा निधी वाचवून तो गरजू विद्यार्थ्यांच्या हितासाठी वापरण्याचा स्तुत्य निर्णय घेण्यात आला.




याच अनुषंगाने विभागातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे अनेक गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत मिळाली असून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.या उपक्रमातून समाजाला एक सकारात्मक संदेश देण्यात आला की, वाढदिवस हा केवळ दिखाव्यासाठी नसून तो समाजासाठी काहीतरी चांगले करण्याची संधी असते. आमले दांपत्याचा हा उपक्रम निश्चितच इतरांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे

# भैरवनाथाच्या नावानं चांगभलं, मिरज गावात भैरवनाथ यात्रेला सुरुवात

**दैनिक युवक आधार**

**सतीश शिंदे/मिरजगाव प्रतिनिधी** : मिरजगाव शहरातील ग्रामस्थांचे श्रद्धास्थान असलेले ग्रामदैवत श्री भैरवनाथाची यात्रा शनिवारी सुरुवात होत आहे सालाबाद प्रमाणे यंदा देखील यात्रोत्सव निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम तसेच यात्रेकरिता येणाऱ्या भाविक भक्तांकरिता मनोरंजन नगरी येथील बाजारतळ या ठिकाणी सज्ज झाली आहे यात्रा उत्सव निमित्ताने भैरवनाथाच्या मंदिरामध्ये भव्य पुष्पहार यांची सजावट व आकर्षक अशी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे सर्वांचे रक्षण करणारा आणि नवसाला पावणारा




श्री भैरवनाथ यात्रे दिवशी शनिवारी श्रीक्षेत्र पंढरपूर येथून पाणी घेऊन पायी आलेल्या कावडीचे शहरात सकाळी सात वाजता आगमन होणार आहे दरम्यान यात्रा उत्सव कमिटी व समस्त ग्रामस्थांच्या वतीने कावडीचे शहरात जोरदार स्वागत करण्यात येईल यावेळी आलेल्या कावडीचे नामांकित दृष्टी बँजो करमाळा व हलगी ग्रुप करमाळा या पारंपारिक वाद्यसह वाजत गाजत भैरवनाथाच्या नावानं चांगभलं च्या जय घोषात शहरातून प्रमुख मार्गावरून व बाजारपेठेतून भव्य मिरवणूक निघेल मिरवणुकीनंतर श्री भैरवनाथ मंदिरात येथील मानकरी व ग्रामस्थांच्या वतीने श्री क्षेत्र पंढरपूर येथून आणलेल्या पवित्र पाण्याने ग्रामदैवत भैरवनाथाला अभिषेक करून विधिवत पूजा करण्यात येणार आहे यानिमित्ताने मंदिरात दिवसभर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना महाप्रसाद वाटपाचे आयोजन करण्यात आले आहे यानंतर सायंकाळी आठ वाजता भैरवनाथाच्या पालखीची मिरवणूक नवीन व जुन्या गावातून वाजत गाजत शहरातील मुख्य मार्गावरून काढण्यात येईल त्यानंतर रात्री दहा वाजता काळा मारुती मंदिर या ठिकाणी मिरवणूक समारोप होईल यावेळी डोळे दीपवणारी नयनरम्य शोभेची दारूची जोरदार आतिश बाजी करून विविध प्रकारच्या शोभेच्या दारूच्या तोफा उडविण्यात येणार आहे मिरजगाव येथील ग्रामदैवत भैरवनाथाची मोठी आख्यायिका असून हे नवसाला पावणारे दैवत आहे यात्रेकरिता बाहेर गावाहून आलेल्या पाहुणेमंडळी व आबाल वृद्ध तसेच गावातील ग्रामस्थांना मनोरंजन म्हणून येथील यात्रेत वेगवेगळ्या प्रकारचे खेळणी चे दुकाने पाळणे मोठ्या प्रमाणात आल्याने आलेल्या भाविकांना दुकानातून खरेदी करत आनंद लुटता येणार आहे असे यात्रा उत्सव कमिटीने सांगितले असून यात्रेचे परिपूर्ण नियोजन केले असल्याचे यात्रा कमिटीने सांगितले आहे. यात्रेचे नियोजन करताना माझी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक श्री संपतराव जी बावडकर सर श्री.लहू वतारे, माजी सरपंच सारंग घोडेस्वार ग्रामपंचायत सदस्य श्री कोरडे भाजपा मिरजगाव शहर अध्यक्ष श्री संजय शेलार आधी दिसत आहेत.

# के.सी. कॉलेज मुंबई आयोजित कार्यशाळा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी** : एच एस एन सी विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या के.सी. कॉलेज,मुंबई येथे दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी "रेझ्युमे बिल्डिंग" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेसाठी भारती विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजेंट स्टडीज अँड रिसर्च, नवी मुंबई येथील पीएच.डी. कार्यक्रमाचे प्रमुख डॉ. कुलदीप भालेराव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांना आजच्या स्पर्धात्मक रोजगार बाजारात प्रभावी आणि व्यावसायिक रेझ्युमे तयार करण्यासाठी आवश्यक कौशल्ये




विकसित करून देणे हा होता. डॉ. भालेराव यांनी आपली शैक्षणिक पात्रता, कौशल्ये आणि कामगिरी यांचे सुसूत्र व प्रभावी सादरीकरण कसे करावे याचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना रेझ्युमेचे योग्य स्वरूप निवडणे, नोकरीच्या प्रकारानुसार रेझ्युमे सानुकूलित करणे, वैयक्तिक ताकद अधोरेखित करणे तसेच सामान्य चुका टाळणे या महत्त्वाच्या बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्यक्ष उदाहरणे आणि व्यावहारिक माहितीमुळे ही कार्यशाळा अधिक रंजक व संवादात्मक ठरली.

विद्यार्थ्यांनी या सत्रात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आणि त्याच्या स्पष्टता व उपयुक्ततेचे कौतुक केले. अनेक विद्यार्थ्यांनी नमूद केले की, या कार्यशाळेमुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला असून ते आता नोकरीसाठी योग्य रेझ्युमे तयार करण्यास अधिक सक्षम झाले आहेत. हा उपक्रम संस्था आणि उद्योग यांच्यातील दरी कमी करण्याच्या महाविद्यालयाच्या बांधिलकीचे प्रतीक आहे.

ही कार्यशाळा प्रा. (डॉ.) तेजश्री शानभाग, प्रभारी प्राचार्य, डॉ. शालिनी सिन्हा, उपप्राचार्य, आणि डॉ. कुलविंदर कौर, वाणिज्य विभाग प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडली. त्यांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या करियरसाठी लाभ झाला.

# सणसरमध्ये समाजकल्याण सभापती जितेंद्र बडेकर यांचा सदिच्छा दौरा

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : पुणे जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती जितेंद्र बडेकर यांनी सणसर गावचे माजी सरपंच पार्थ बाबा निंबाळकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. बारामती विधानसभा मतदारसंघातील श्रीमती सुनेत्रावहिनी पवार यांच्या निवडणुकीचा नारळ फोडण्यासाठी जिल्ह्यातील सर्व नेते श्री क्षेत्र कन्हेरी येथे आले होते. त्यावेळी नुकतीच जिल्हा परिषद सभापती पदी निवड झाल्याबद्दल पार्थ बाबा निंबाळकर यांनी त्यांचा सत्कार करून सणसर गावातील विकासकामांची माहिती व अडचणी मांडल्या.

या भेटीप्रसंगी माजी सरपंच विजयसिंह निंबाळकर, बांधकाम कामगार तालुका अध्यक्ष शब्बीर काझी, सणसर सोसायटीचे संचालक



सोमनाथ उर्फ पिंटू गुप्ते, माजी ग्रामपंचायत सदस्य शरद कांबळे जितेंद्र काटे, बाला पाटील, सुभाष निंबाळकर तसेच ठेकेदार दिपक माने उपस्थित होते या सदिच्छा भेटीत गावातील विकासकामे,प्रलंबित प्रश्न आणि पुढील नियोजन यावर चर्चा झाली. गावकऱ्यांनी सभापतींकडे अपेक्षा व्यक्त करताना प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी केली.

# पूर्णा शहरात खड्डे बुजवण्याचे तात्पुरते काम; भीम जयंतीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचा संताप

**दैनिक युवक आधार**

**पूर्णा | प्रतिनिधी/ शिवाजी लोंढे** : पूर्णा नगरपालिकेकडून शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याचे काम सध्या सुरू असले तरी हे काम अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात होत असल्याचे चित्र समोर येत आहे. अनेक ठिकाणी खड्ड्यांमध्ये फक्त माती व खडी टाकून काम उरकले जात असून, काही तासांतच पुन्हा रस्त्यांची अवस्था पूर्ववत होत आहे.



भीम जयंतीनिमित्त शहरातील विविध मंडळांचे वाहन व नागरिकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ वाढणार आहे. अशा परिस्थितीत मुख्य रस्त्यांची दुरवस्था नागरिकांसाठी धोकादायक ठरत आहे. विशेषतः जयंती मिरवणुकीच्या मार्गांवरच खड्ड्यांची संख्या अधिक असल्याने प्रशासनाच्या कामावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, “नगरपालिकेकडून केवळ दिखाव्यासाठी काम केले जात आहे. कायमस्वरूपी उपाययोजना न करता फक्त तात्पुरती दुरुस्ती केली जात असल्याने लोकांना त्रास सहन करावा लागत आहे.”शहरातील अनेक भागांमध्ये रस्त्यांची अशीच दयनीय अवस्था असून, वाहतूक कोंडी व अपघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे भीम जयंतीपूर्वी रस्त्यांची योग्य व दर्जेदार दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.याबाबत प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन दर्जेदार काम करावे व नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन म्हणजे त्यांच्या आत्मविश्वासाला दिलेले बळ - उमेश पाटील हेंबाडे

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/ रणजितसिह. ठाकूर** : तालुक्यातील स्वामी विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व्याड तालुका रिसोड जिल्हा वाशिम येथे 10 एप्रिल ला वर्ग दहावी बारावी ची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते विद्यालयाचे प्राचार्य रवी अंभोरे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते मुख्य मार्गदर्शक म्हणून उमेश हेंबाडे पाटील उपमुख्य कार्यकारी अधिकारी नगरपरिषद काटोल हे उपस्थित



होते ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्व उन्नती स्वप्रतिष्ठा हस्तगत करायची असेल तर शिक्षण हा एकमेव पर्याय आहे परंतु बदललेल्या सामाजिक परिस्थितीनुसार केवळ शिक्षण घेऊन फारसं यश मिळवता येत नाही परंतु शिक्षणासोबतच स्पर्धा परीक्षा डोळ्यासमोर ठेवून अध्ययन केले तर कोणत्याही स्पर्धा परीक्षेत सहज यशस्वी होणे सोपे जाते ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाची उणीव असल्यामुळे अतिशय गुणवान प्रतिभावंत विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेनुसार फारसं काही मिळवता येत नाही मात्र मार्गदर्शन मिळाल्यास ग्रामीण भागातील कोणताही विद्यार्थी शहरी भागातील विद्यार्थ्यांपेक्षा किंचितही कमी नाही शाळा महाविद्यालयामधून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेकडे वळविण्यासाठी फारसे प्रयत्न होताना दिसत नाहीत ग्रामीण भागातील शिक्षणाचे प्रमाण जरी वाढले असले तरी स्पर्धा परीक्षेच्या शर्यतीत उतरावेत असे विद्यार्थी संख्येने फार कमी असल्याचे भासते आहे विद्यार्थ्यांनी शिक्षण हे केवळ नोकरी पुरते किंवा स्वतःच्या फायद्यासाठी न घेता आपल्या कुटुंबाचे नातेवाईकांचे आणि समाजाचे हित आणि प्रतिष्ठा जोपासून देशाचा खंबीर आधार बनन्यासाठी करावा असे प्रोत्सानपर मार्गदर्शन उमेश हेंबाडे यांनी केले. प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य रवि अंभोरे यांनी उमेश हेंबाडे यांनी बहुमूल्य वेळ देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाला जेष्ठ शिक्षक गजानन घाटोळ, ज्ञानेश्वर मांडे, अमोल देशमुख,गणेश हेंबाडे, गजानन लांभाडे, रामेश्वर पवार, कु. दुर्गा घोगरे, संदीप पवार इत्यादी उपस्थित होते.कार्यकर्माचे सूत्रसंचालन प्रवीण सरनाईक यांनी तर आभार गजानन घाटोळ यांनी मानले. कार्यकर्माच्या यशस्वीतेसाठी रमेश पडघान, वैभव सरनाईक, भारत माकोडे यांनी सहकार्य केले. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी झालेल्या मार्गदर्शनाचा लाभ घेण्याचे आश्वासन दिले.

## मन करा रे प्रसन्न | सर्व सिद्धीचे कारण | मोक्ष अथवा बंधन | सुख समाधान इच्छा ते ||

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका** : संत तुकाराम महाराज यांच्या या अत्यंत प्रभावशाली ओळी आहेत. माणसाच्या आयुष्यातील यशाचा आणि शांततेचा मूळ मंत्र या शब्दांत दडलेला आहे.

या ओळींचा सविस्तर अर्थ आणि आपल्या दैनंदिन जीवनात त्यांचा वापर कसा करावा, हे खालीलप्रमाणे आहे:

**ओळींचा अर्थ**

मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण:

जर तुमचे मन आनंदी, शांत आणि सकारात्मक असेल, तर तुम्ही कोणतेही कार्य यशस्वीपणे पूर्ण करू शकता. कोणत्याही ‘सिद्धी’साठी (यशासाठी किंवा ध्येयप्राप्तीसाठी) प्रसन्न मन हे सर्वात पहिले आणि महत्त्वाचे साधन आहे.

**मोक्ष अथवा बंधन, सुख समाधान इच्छा ते:**

तुम्ही स्वतःला मुक्त समजता की संकटांत अडकलेले, तुम्हाला आयुष्यात सुख मिळते की दुःख, हे सर्वस्वी तुमच्या मनाच्या स्थितीवर आणि इच्छेवर अवलंबून असते. मन प्रसन्न असेल तर साध्या गोष्टींतही समाधान मिळते आणि मन विचलित असेल तर सर्व काही असूनही माणूस दुःखीच राहतो.

**दैनंदिन जीवनात वापर**

या विचारांचा वापर करून आपण आपले जीवन अधिक सुसह्य आणि यशस्वी करू शकतो:

**१. कामाचा ताण व्यवस्थापित करताना**

ऑफिसमध्ये किंवा व्यवसायात जेव्हा कामाचा खूप लोड असतो, तेव्हा आपण चिडचिड करतो. अशा वेळी *”मन करा रे प्रसन्न”* हे ब्रीदवाक्य आठवावे. मन शांत ठेवून काम केल्यास चुका कमी होतात आणि कठीण कामही सोपे वाटते.

**२. नातेसंबंधांमध्ये**

अनेकदा आपण समोरच्या व्यक्तीच्या बोलण्याचा चुकीचा अर्थ काढतो आणि स्वतःचे मन दुखावून घेतो. आपले सुख-समाधान आपल्या हातात आहे हे लक्षात ठेवून, क्षुल्लक गोष्टींकडे दुर्लक्ष केल्यास नातेसंबंध अधिक घट्ट होतात.

**३. आरोग्यासाठी**

आयुर्वेदानुसार ‘प्रसन्न आत्मेन्द्रियमनः’ म्हणजेच ज्याचे मन प्रसन्न आहे तोच खरा निरोगी. रोज सकाळी पाच मिनिटे शांत बसून मनाला सकारात्मक सूचना दिल्यास दिवसभर ऊर्जा टिकून राहते.

**४. कठीण प्रसंगात संयम ठेवण्यासाठी**

आयुष्यात जेव्हा आपल्याला हवं तसं घडत नाही, तेव्हा आपण हताश होतो. पण हे लक्षात ठेवा की ‘बंधन’ किंवा ‘मोक्ष’ (संकटातून सुटका) हे आपल्या विचारांवर अवलंबून आहे. परिस्थिती बदलण्यापेक्षा त्या परिस्थितीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला, की समाधान आपोआप मिळते.

**५. आहाराचा आनंद घेताना**

जेवताना जर मन प्रसन्न असेल, तर साधे अन्नही अमृतासारखे लागते आणि ते शरीराला नीट लागते. म्हणूनच आनंदी मनाने भोजन करणे हे उत्तम आरोग्याचे गुपित आहे.

**थोडक्यात सांगायचे तर:**

तुमच्या बाह्य जगात काय घडते यापेक्षा तुमच्य अंतर्मनात काय चालते, याला तुकाराम महाराजांनी जास्त महत्त्व दिले आहे. मन जिंकले की जग जिंकता येते, हाच या ओळींचा मुख्य संदेश आहे.

# लायन्स सरगम कराओके स्टार 2026 स्पर्धा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर )** : लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम तर्फे लायन्स सरगम कराओके स्टार 2026 या कराओके गायन स्पर्धा नुकत्याच यशस्वीरित्या संपन्न झाल्या. या स्पर्धेला पुणे, अलिबाग, माणगाव, मुंबई, नवी मुंबई आणि पनवेल येथील स्पर्धकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे 1 स्पर्धक रतलाम, मध्य प्रदेश येथून सुद्धा सहभागी झाला होता. या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे उद्घाटन नगरसेवक गणेश कडू यांचे हस्ते संपन्न झाले. त्यांनी सरगम क्लबच्या कार्याचे कौतुक करुन स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. प्रीतम दादा म्हात्रे यांनी देखील या स्पर्धेला उपस्थित राहून सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. या वेळी जेष्ठ पत्रकार संजय कदम, पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे अध्यक्ष राजेंद्र पाटील, सल्लागार मंदार दोंदे , हरेश साठे ,निलेश सोनावणे ,प्रवीण मोहकर , लालचंद यादव,राजू गाडे आदी सदस्य यावेळी उपस्थित होते . यावेळी प्राथमिक फेरीतून निवडल्या गेलेल्या स्पर्धकांची अंतिम फेरी मोठ्या अटीतटीची होती. 5 गटांमध्ये झालेल्या या स्पर्धेतील



विजेत्यांची नावे गट 18 वर्षापर्यंत प्रथम क्रमांक - तनिषा चव्हाण, द्वितीय क्रमांक - निषाद मरोडकर, गट - 18 ते 40 प्रथम क्रमांक - श्रुती सावंत, द्वितीय क्रमांक - सोजी मॅथ्यू, गट - 41 ते 60 प्रथम क्रमांक - चेतन म्हात्रे, द्वितीय क्रमांक - शिवदास नाखवा, तृतीय क्रमांक - वैशाली देशमुख, उत्तेजनार्थ - सुबोध जोशी, गट - 61+ प्रथम क्रमांक - सतीश गुणे, द्वितीय क्रमांक - दीपक दास , उत्तेजनार्थ - अमित तांडेल गट - लायन्स प्रथम क्रमांक - दिपाली टेलर,

द्वितीय क्रमांक - देवेंद्र पाटणे अंतिम फेरीतील विजेत्यांना रोख बक्षीस, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून द्वितीय प्रांतपाल विजय गणात्रा हे उपस्थित होते. या स्पर्धांच्या प्राथमिक फेरीसाठी विनायक प्रधान आणि सतीश मोरे तर अंतिम फेरीसाठी वंदना सहस्त्रबुद्धे आणि सुदाम रघुनाथ यांनी परीक्षक म्हणुन काम पाहिले. या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी अध्यक्ष प्रेमेंद्र बहिरा, सचिव आदित्य दोशी, खजिनदार धवल शहा, अल्केश शहा,संजय गोडसे, स्वाती गोडसे, मानदा पंडित, संध्या महानुभाव, अनिल परमार, सुनील देशपांडे, ओंकार खेडकर,मिलिंद जोशी, अश्विनी खेडकर आदि सभासदांनी खूप परिश्रम घेतले.




**वंचित बहुजन आघाडी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर यांना पनवेल येथील सत्यशोधक परिषदेच्या कार्यक्रम दरम्यान वंचित बहुजन आघाडी पनवेल चे युवा नेते पत्रकार शंकर वायदंडे व वंचित बहुजन आघाडी तलोजा युवा नेते संदेश लहू घाडगे सागर उघडे दिनकर कसबे आनंद खरात सोबत अनेक कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी यांनी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या**

**( दैनिक युवक आधार )**

# क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांना महावितरणचे अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग** : थोर समाज क्रांतिकारक, यशस्वी उद्योजक, प्रखुर विचारवंत आणि दीन-दलितांसह शेतकरी व बहुजन समाजाचे उद्धारक क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त आज महावितरणच्या वतीने त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

महावितरणच्या काटोल मार्ग येथील 'विद्युत भवन' कार्यालयात आयोजित कार्यक्रमात नागपूर




परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. याप्रसंगी बोलताना मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी महात्मा फुले यांच्या शिक्षणविषयक अतुलनीय कार्यावर प्रकाश टाकला आणि त्यांच्या विचारांची आजच्या काळात असलेली गरज अधोरेखित केली. कार्यक्रमात राकेश सयाम यांनी महात्मा फुले यांच्या जीवनप्रवासातील प्रेरणादायी प्रसंगांना उजाळा देत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या सोहळ्याला सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, प्रणाली विश्लेषक प्रवीण काटोले, प्रभारी कार्यकारी अभियंता अजित जिचकार आणि उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर यांच्यासह महावितरणचे विविध विभागांतील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी प्रतिमेचे दर्शन घेऊन महामानवास विनम्र अभिवादन केले.

# कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांची केंद्रीय लोकशाही पत्रकार संघाकडून सदिच्छा भेट; 'फुलांचे झाड' देऊन अनोखे स्वागत

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई / प्रतिनिधी** : कोकण विभागीय आयुक्तपदाची सूत्रे स्वीकारलेल्या श्रीमती रुबल अग्रवाल यांची केंद्रीय लोकशाही पत्रकार संघाच्या शिष्टमंडळाने नुकतीच कोकण भवन येथे भेट घेतली. या भेटीत केवळ सदिच्छा प्रदान न करता, पत्रकारांच्या प्रलंबित प्रश्नांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली.

**पर्यावरणपूरक स्वागत:**

नूतन आयुक्तांचे स्वागत करताना शिष्टमंडळाने एक स्तुत्य उपक्रम राबवला. केवळ पुष्पगुच्छ न देता, पर्यावरणाचा संदेश देत त्यांना



*फुलांचे झाड असलेली कुंडी* आणि शाल देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी केंद्रीय लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. मुनीर तांबोळी, पनवेल तालुका अध्यक्ष अबरार मास्टर, व्हॉईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष अभिजित दरेकर, दैनिक बेधडकचे संकेत घेवारे, पत्रकार गणेश लोट व अन्य सदस्य उपस्थित होते.

**प्रलंबित प्रश्नांवर स्वतंत्र बैठक:**

या चर्चेदरम्यान पत्रकारांच्या अडचणी आणि अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या विविध प्रश्नांकडे आयुक्तांचे लक्ष वेधण्यात आले. श्रीमती रुबल अग्रवाल यांनी या समस्या अत्यंत सकारात्मकरीत्या समजून घेतल्या. प्रशासकीय कामात पारदर्शकता आणणे आणि पत्रकारांशी सुसंवाद राखणे ही आपली प्राथमिकता असल्याचे सांगून, या प्रश्नांच्या निराकरणासाठी लवकरच एक स्वतंत्र बैठक आयोजित करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.प्रशासकीय प्रमुख आणि पत्रकार संघ यांच्यातील या सकारात्मक संवादामुळे पत्रकारांच्या समस्या लवकरच सुटतील, अशी चिन्हे दिसत आहेत.

# इंदोरा - दिघोरी पुलाला सम्राट अशोकाचे नाव देण्याची मागणी

## केंद्रीय मंत्री गडकरींना निवेदनः सुरेश गोटेकर

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू /संपादक नागपूर विभाग** : सम्राट अशोका फाऊंडेशनचे अध्यक्ष सुरेश गोटेकर यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांची प्रत्यक्ष भेट घेतली आणि इंदोरा-दिघोरी पुलाला प्रियदर्शी सम्राट अशोकाचे नाव देण्याची मागणी केली. इतर मागण्यांमध्ये अशोक चौकात सम्राट अशोकाचा पूर्णाकृती पुतळा बसविणे (स्टॅच्यू ऑफ पीस), संविधानाने स्वीकारलेले



राष्ट्रीय अशोक चिन्ह स्थापित करणे, केंद्र सरकारने सम्राट अशोकाच्या जयंतीनिमित्त तिथि नुसार सुट्टी जाहीर करणे, अशोक कालीन स्तूप, लेणी, शिलालेख आणि स्तंभांचे जतन करणे, तसेच पुलाच्या स्तंभांवर सम्राट अशोकाचे जीवन दर्शवणारी भित्तिचित्रे रेखाटणे यांचा समावेश करण्यात यावा. छत्रपती चौकातील शिवाजी महाराज आणि त्यांच्या सैन्याच्या पुतळ्याप्रमाणेच सम्राट अशोकाच्या पुतळ्याचीही सजावट करण्यात यावी. विजयादशमी पर्यंत हे काम पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे. शिष्टमंडळात कृष्णा सहारे, राजू गणवीर, अनिलनाथ शील, किरण गौरखेडे, शिल्पा नागदेवते, नंदिनी वाळके, लीलाताई तामगाडगे, पुष्पा धाबर्डे, रमा रामटेके, रत्नमाला नगरारे, प्रतिभा गोटेकर, माधुरी तायडे, भीमराव निकोसे, एस म्हैसकर, शंभूराजे आदींचा समावेश होता. केंद्रीय मंत्र्यांनी शिष्टमंडळाला आश्वासन दिले आहे. अशी माहिती सुरेश गोटेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

## कुंभलकर समाजकार्य महाविद्यालयात महात्मा फुले जयंती उत्साहात; अंधश्रद्धा निर्मूलनाचा जागर

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ सुनिल भगत**

**दक्षिण नागपूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जिल्हा नागपूरच्या वतीने सामाजिक समता सप्ताह निमित्त महात्मा ज्योतिराव फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त कुंभलकर समाजकार्य संध्याकालीन महाविद्यालय, राजीव नगर येथे प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजप्रबोधन, अंधश्रद्धा निर्मूलन आणि स्त्री सक्षमीकरणाचा संदेश देणारा हा उपक्रम ठरला.






कार्यक्रमात "बुवाबाजी, महिलांचे शोषण आणि अंधश्रद्धा" या विषयावर डॉ. सुनिल भगत यांनी प्रभावी व विचारप्रवर्तक व्याख्यान देत उपस्थितांना सजगतेचा संदेश दिला. समाजात वाढत चाललेल्या अंधश्रद्धांच्या घटनांवर प्रकाश टाकत त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन केले.

यावेळी शोभा पाटील आणि गौतम पाटील या दांपत्याने सादर केलेला 'रमाई' हा ३० मिनिटांचा नाट्यविष्कार विशेष लक्षवेधी ठरला. या सादरीकरणातून महिलांच्या संघर्षाची जाणीव करून देत सामाजिक वास्तव अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमात रामभाऊ डोंगरे यांनी समितीच्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती देत समाजातील अंधश्रद्धेविरुद्धच्या लढ्याची दिशा स्पष्ट केली.या प्रसंगी विजया श्रीखंडे, देवयानी भगत, डॉ. विकास होले, सुषमा होले, ॲड. विद्या खोब्रागडे, आंचल पाटील, चंदूलाल पाटील, कल्पना पाटील, प्राचार्य फुलेकर, प्रा. धबाले यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक वर्ग आणि अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमामुळे सामाजिक समता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि स्त्री सन्मान याबाबत जनजागृती होऊन उपस्थितांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली.

# युवकांनी योग्य दिशेने वाटचाल केल्यास देशाचं भविष्य उज्ज्वल - पो.नि.श्रीदेवी पाटील

## महात्मा ज्योतिबा फुले व डॉ . बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अडोळी येथे रक्तदानातून मानवतेचा जागर

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : ११ एप्रिल महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त वाशिमजवळील ग्राम अडोळी येथे दि. ११ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता भव्य रक्तदान व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हा उपक्रम फुले-शाहू-आंबेडकर ब्लड डोनर व रुग्ण सेवा ग्रुप, महाराष्ट्र तसेच समता सैनिक दल आणि जयंती उत्सव समिती अडोळी यांच्या संयुक्त विद्यमाने उत्साहात पार पडला.



**"रक्तदान हे केवळ एक सामाजिक कर्तव्य नसून, ते मानवतेचे सर्वोच्च रूप आहे. एका व्यक्तीच्या रक्तदानामुळे दुसऱ्याला नवजीवन मिळते, हीच खरी समाजसेवा आहे. युवकांनी योग्य दिशा निवडून शिक्षण, स्पर्धा परीक्षा आणि सामाजिक कार्य यात सक्रिय सहभाग घेतला, तर देशाचा भविष्यकाळ नक्कीच उज्ज्वल होईल."**
**— पो.नि.श्रीदेवी पाटील**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ. सविता इढोळे होत्या, तर उद्घाटक म्हणून वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशनच्या ठाणेदार पोलीस निरीक्षक श्रीदेवी पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघण, संस्थापक अध्यक्ष प्रदीप पट्टेबहादूर, जिल्हा रक्तपेढी विभागाचे सचिन दंडे, मुख्यमंत्री वैद्यकीय पथकाचे जिल्हाध्यक्ष भागवत सावके, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद इडोळे, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजकुमार पडघण आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून करण्यात आली. यावेळी मान्यवरांनी समाजातील वंचित घटकांसाठी कार्य करण्याचे आणि रक्तदानासारख्या उपक्रमांद्वारे मानवतेचा संदेश देण्याचे आवाहन केले.उद्घाटक पो.नि. श्रीदेवी पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "रक्तदान हे सर्वोच्च दान असून अशा उपक्रमांमुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळते. युवकांनी सद्गुण अंगी बाळगून स्पर्धा परीक्षा करून मोठे अधिकारी व्हावे तसेच सामाजिक कार्यात सहभागी होऊन समाजासाठी योगदान द्यावे." त्यांच्या या प्रेरणादायी विचारांचे उपस्थितांनी स्वागत केले.

या शिबिरात मोठ्या संख्येने युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले. तसेच नागरिकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला व आयुष्यमान भारत कार्ड काढण्यात आले. जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिम येथील तज्ज्ञ डॉक्टर, प्राथमिक आरोग्य केंद्र अडोळी येथील वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट सेवा व मार्गदर्शन दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकुमार पडघण यांनी केले, प्रास्ताविक पंकज पडघण यांनी सादर केले, तर आभार प्रदर्शन वैभव पाटील यांनी मानले. गावातील युवक व नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा उपक्रम यशस्वी ठरला.

## भीम आर्मी भारत एकता मिशन मुंबई मंत्रालयाकडे पैदल लॉंगमार्च धडक मोर्चा उमरी शहरात दाखल

**दैनिक युवक आधार**
**उमरी वार्ताहर/रूपेशकुमार ग.श्रीरामवार** : भीम आर्मी भारत एकता मिशन मौजे माष्टी तालुका धमार्बाद येथील बौद्ध समाजाच्या स्मशानभूमीची नोंद गाव नमुना क्रमांक आठ मध्ये करा अशी मौजे माष्टीच्या संदर्भातली रास्त मागणी असून गेल्या ४० वषार्पासून बौद्ध समाजाच्या स्मशानभूमीची सदरील जागा प्रत्यक्ष वापरात आहे. पण अलीकडच्या काळात त्या जागेवर इतर समाजाचे लोक हक्क सांगत असून यासंदर्भात कुंडलवाडी पोलीस ठाण्याच्या अंतर्गत बऱ्याच जनावर गुन्हेही दाखल झालेले आहेत.धमार्बाद तालुक्यातून मौजे मनूर येथे बौद्ध विहार व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साठी जागा उपलब्ध करून द्या अशी मागणी बौद्ध बांधवांची होती. पण गांवात





उपलब्ध असतानाही गांवकऱ्यांनी संबंधित जागा बौद्ध समाजासाठी उपलब्ध करून देण्यास असमर्थता दर्शवली.

उपरोक्त दोन्हीही गावे १९८३ साली पुनर्वसित झालेली आहेत.त्या काळात खरे तर प्रत्येक हिंदू बौद्ध मुस्लिम आदी बांधवांच्या देवस्थानासाठी जागा आरक्षित करणे गरजेचे होते. आज घडीलाही बऱ्याच गावात ही समस्या आहे. माष्टी व मनुर या गावी जागा असतानाही विरोध होत आहे ही गांभीयार्ची गोष्ट आहे. अद्यापही शासन व प्रशासनाने योग्य दखल घेत नसल्याचे निर्दशनास आले असता.

भीम आर्मी भारत एकता मशीनचे नांदेड जिल्हाध्यक्ष स्वप्नील भोसीकर यांच्या मार्गदर्शनाखाली, नांदेड जिल्हा निरीक्षक बुद्धिवंत लोखंडे, धर्माबाद तालुका अध्यक्ष कुलदीप मस्के यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही गांवातील महिला पुरुष व युवा वर्ग मुंबई मंत्रालयाकडे पैदल लॉंगमार्च मंत्रालयावर धडक मोर्चा सहभागी झाले हा मोर्चा उमरी शहरात दि 11 एप्रिल रोजी दाखल होताच त्यांचे स्वागत करण्यात आले व त्यांच्या संविधानिक लढ्यास नागरिकांनी पाठींबा दर्शविला पैदल लॉंगमार्च उमरी येथुन पुढे मुदखेड मार्ग मुंबई च्या दिशेने मार्गस्थ झाले.

## सोमलवाडा /मेंढा येथे महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**लाखनी प्रतिनिधी** : समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ओमप्रकाश हुमने यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले, तर उद्घाटक म्हणून उमेश सिंगनजुडे यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले.




उमेश सिंगनजुडे यांनी आपल्या भाषणात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, "महात्मा फुले यांनी समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि अन्यायाविरुद्ध लढा देऊन शिक्षणाचा प्रकाश प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचे महान कार्य केले. आज आपण ज्या समतेचा आणि अधिकारांचा लाभ घेत आहोत, त्यामागे फुले दांपत्याचे मोठे योगदान आहे."ते पुढे म्हणाले की, "आजच्या पिढीने फुले यांच्या विचारांचा केवळ सन्मान न करता, ते आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणणे गरजेचे आहे. शिक्षण, समानता आणि स्त्री-पुरुष समता हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल." शेवटी त्यांनी उपस्थितांना आवाहन केले की, "समाजात अजूनही असलेल्या विषमता दूर करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा आणि फुले यांच्या विचारांचा प्रसार करावा."कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. सुरेश खोब्रागडे यांनी महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर सखोल प्रकाश टाकत शिक्षण, समता आणि सामाजिक न्याय यांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून विश्वजित हुमने, नरेश टिचकुले, रेखा वासनिक आणि गौतम हुमने यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोशन खोब्रागडे यांनी प्रभावीपणे केले, तर आभारप्रदर्शन आर्यन नागदेवे यांनी मानले.यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कु. सोनल सुखदेव फंदे, कु. जान्हवी अतकरी आणि योगेंद्र गौतम हुमने यांचा विशेष सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मयुर गणवीर, कुणाल रामटेके, अंबादास नागदेवे, श्रीकांत नागदेवे तसेच आयोजन समितीच्या सर्व सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.हा कार्यक्रम समाजातील सर्व घटकांना प्रेरणा देणारा ठरला.

## भव्य स्वागत कार्यक्रमाने नांदेडमध्ये भीम जयंती उत्साहात साजरी होणार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी -प्रकाश गवारे/नांदेड :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त नांदेड शहरात भव्य स्वागत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मान्यवर काशीरामजी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, नांदेड यांच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, शहरातील सर्व भीम जयंती मंडळांचे यावेळी स्वागत करण्यात येणार आहे.




वजीराबाद चौक, एस. पी. ऑफिसजवळ आयोजित या कार्यक्रमात सकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत विविध उपक्रम पार पडणार आहेत. कार्यक्रमाचा मुख्य उद्देश नांदेड शहरातील सर्व भीम जयंती मंडळांनी शांततेत, शिस्तबद्ध पद्धतीने आणि आकर्षक देखाव्याद्वारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करणे हा आहे.

यावेळी विशेष आकर्षण म्हणून आकर्षक देखावे सादर करणाऱ्या सर्व भीम जयंती मंडळांना संस्थेच्या वतीने सन्मानपत्र देण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे मंडळांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, मोठ्या संख्येने सहभागी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हा कार्यक्रम शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी शहरातील जास्तीत जास्त भीम जयंती मंडळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राहुल कोकरे, सुभाष लोखंडे, बी. एस. गोडबोले, जयकुमार पंडित यांच्यासह बहुजन नायक मान्यवर काशीरामजी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, नांदेड यांचे विशेष प्रयत्न आहेत.

## व्हॉइस ऑफ मीडिया पत्रकारांची बैठक उत्साहात संपन्न

### पत्रकारांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध संघटितपणे लढा- शशिकांत भोयर

**दैनिक युवक आधार**
**रोशन खोब्रागडे /भंडारा (प्रतिनिधी):** व्हॉइस ऑफ मीडिया या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या वतीने भंडारा जिल्ह्यातील प्रिंट, इलेक्ट्रॉनिक तसेच सोशल मीडिया (यूट्यूब) पत्रकारांची महत्त्वपूर्ण बैठक दि. ११ एप्रिल रोजी शासकीय विश्रामगृह, भंडारा येथे उत्साहात पार पडली.बैठकीचे अध्यक्षस्थान संघटनेचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष शशिकांत भोयर यांनी भूषविले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून काशिनाथ ढोमणे, प्रा. राहुल डोंगरे, विशाल रणदिवे आणि अनिल कारेमोरे यांनी पत्रकारांना मार्गदर्शन केले.



या बैठकीत जिल्हाभरातील पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून संघटनेच्या कार्यात सक्रिय सहभाग नोंदविण्याची तयारी दर्शवली. यावेळी भंडारा जिल्ह्यासाठी नव्या जिल्हा कार्यकारिणीची नियुक्ती करण्यात आली. तसेच तालुका व शहर स्तरावर कार्यकारिणी गठीत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

बैठकीदरम्यान पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पत्रकारांच्या पाल्यांसाठी मोफत शिक्षण, पत्रकारांसाठी पेन्शन योजना, बस पास सुविधा तसेच घरकुल योजना यांसारख्या विषयांवर सकारात्मक भूमिका मांडण्यात आली. पत्रकारांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध संघटितपणे लढा देण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला. अध्यक्ष शशिकांत भोयर यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, पत्रकारांचे हक्क व सन्मानासाठी व्हॉइस ऑफ मीडिया संघटना कटिबद्ध असून जिल्ह्यात संघटना अधिक बळकट करण्यावर भर दिला जाईल.

बैठकीचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात झाला. भविष्यात पत्रकारांच्या हितासाठी विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.या बैठकीस रोशन खोब्रागडे, दिलीप रेहपाडे, धर्मेंद्र भुते, मदन कमाने, अमृतलाल चरडे, विकास नंदरधने, संतोष शेंडे, विलास केजरकर, अनमोल मेश्राम, उमेश जांगडे, दिलीप बनसोड, ॲड. राहुल बोंबर्डे, मुकेश कुमार मेश्राम, मनोज चीचगरे, राकेश श्यामकुवर, सुधीर गोमासे, हंसराज रामटेके, कमलेश मेश्राम, प्रचीन वलथरे, अनिल रणदिवे यांच्यासह जिल्ह्यातील अनेक पत्रकार उपस्थित होते.

## नवोदय विद्यालयात जागतिक आरोग्य दिन केला साजरा

**दैनिक युवक आधार**
**परतूर- जालना(अशोक ठोके)** : नवोदय विद्यालय आंबा व एकात्मिक सल्ला समुपदेशन व चाचणी केंद्र ग्रामीण रुग्णालय परतूर यांच्या अंतर्गत आज जागतिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला.सदरील कार्यक्रमात

अध्यक्षस्थानी प्राचार्य एस.जी.पवार (नवोदय विद्यालय आंबा) व वैद्यकीय अधीक्षक डॉ.एल. पी.दुर्गावाड यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.अस्मिता




मोरे (बोनगे) यांनी विद्यार्थांना आपले आरोग्य हीच खरी संपत्ती या विषयी माहिती दिली व दंत तपासणी केली तसेच डॉ.श्रुती जाधव यांनी आरोग्य व आहार या विषयी माहिती दिली.तसेच समुदेशक शिवहरी डोळे यांनी आपली दैनंदिन जीवनशैली कशी असावी या विषयी सविस्तर माहिती दिली. तसेच राजश्री डोळे यांनी वैयक्तिक स्वच्छता या विषयी माहिती दिली.तसेच सदरील विद्यार्थ्यांचे प्रश्नाचे शंका निरसन करून मार्गदर्शन करण्यात आले.तसेच क्षितिजा पवार (नर्सिंग ऑफिसर) यांनी आभार व्यक्त केले.सदरील कार्यक्रमाचे आयोजन क्षितिजा पवार (नर्सिंग ऑफिसर) यांनी केले होते.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# धानोरा महाविद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/ मारुती सत्रे** : तालुक्यातील धानोरा येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवार दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ वाघुले हे तर उपप्राचार्य गहिनीनाथ एकशिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली.

यावेळी प्राचार्य डॉ वाघुले यांनी आपल्या भाषणात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या समाजसुधारक कार्याचा गौरव करताना शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत आज समाजाला क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांची गरज असल्याचे सांगत, तरुणांनी त्यांचे विचार अंगिकारून समाजातील प्रत्येक घटकाचा विकास करावा. आज विज्ञान युगात ही आपल्या देशात काही ठिकाणी अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धाचे प्रकार पहावयास मिळत आहे. महात्मा फुले यांनी त्यांच्या काळात शिक्षणाचे महत्व सांगत अंधश्रध्दा दूर



करून समाजाचा विकास केला. तरुणांनी ही त्यांचे विचार आत्मसात करून समाजाचा विकास करावा असे प्रतिपादन केले. यावेळी उपप्राचार्य एकशिंगे यांनी ही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा निसार शेख यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा राजू शेलार यांनी मानले. या कार्यक्रमाला प्रा विवेक महाजन, प्रा अजिनाथ गिलचे, प्रा गोरक्षनाथ वाळके, प्रा राजेंद्र मिसाळ, प्रा ज्ञानदेव बोडखे, प्रा श्रीमती रत्नमाला तरटे, प्रा श्रीमती शबाना शेख, प्रा अतेश बनसोडे, प्रा सतीश तागड, प्रा नितीन बालशंकर यांच्यासह प्राध्यापक, प्राध्यापिका व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फुले-आंबेडकरांचे प्रेरणादायी विचार अमलात आणणे आजच्या काळाची गरज - प्राचार्य निळकंठ बोरोळे

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे, तालुका प्रतिनिधी, दर्यापूर :** दर्यापूर येथील स्थानिक ढोकणे सभागृहात आयएसओ नामांकन व निती आयोग नोंदणीकृत एनजीओ महात्मा फुले चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती समारोहाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात प्रमुख विश्र्वस्त व प्राचार्य निळकंठ बोरोळे यांनी व्याख्यानातून प्रतिपादन केले की, "फुले-आंबेडकरांचे प्रेरणादायी विचार आजच्या काळात अमलात आणून घराघरात पोहोचविणे ही काळाची गरज आहे."

प्रारंभी महामानवांच्या प्रतिमांचे



पूजन व हारार्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महालक्ष्मी मेडिकल ग्रुपचे संचालक व ज्येष्ठ मार्गदर्शक अण्णासाहेब अडाऊकर होते. उद्घाटक म्हणून भाजपा अध्यात्मिक सेलचे प्रमुख ह. भ. प. श्रीकृष्ण डोंगरे तर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य श्रीकृष्ण मावंदे, प्राचार्य भास्कर जावरकर, ज्येष्ठ विश्वस्त मारोतराव काळे गुरुजी, से. नि. तालुका कृषी अधिकारी राजकुमार अडाऊकर उपस्थित होते.

महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जन्मदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे औचित्य साधून राजकुमार अडाऊकर यांनी ट्रस्टच्या रचनात्मक व विधायक कामाची दखल घेऊन 51 हजार रुपयांची देणगी जाहीर केली. त्याबद्दल सौ. अरुणा लांडे यांनी त्यांचा सत्कार केला.

यावेळी संपादित 'काव्यगंध' या विचारपुष्पाचे प्रकाशन करण्यात आले. प्रास्ताविक महासचिव रविंद्र ढोकणे यांनी केले. सूत्रसंचालन मुख्य संयोजक प्रदीप लांडे तर आभार प्रदर्शन विश्वस्त अंबादास जावरकर यांनी केले.

विश्वस्त श्रीधर पवार, डॉ. रमेश शेवतकर, राजकुमार गिन्हे, डॉ. अनिल लोखंडे, ग्रामविकास अधिकारी चंद्रशेखर आजनकर, गजानन मेहेरे, मेहेरदीप ढोकणे आदी मान्यवरांनी महामानवांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन केले.

या प्रसंगी फुले-आंबेडकरांचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते, अशी माहिती प्रसिद्ध प्रमुख व विश्वस्त गजानन करुले यांनी दिली.

# जय भवानी ग्रुपच्या पुढाकाराने येवदा माळीपुरा येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंतीचा जल्लोष ; पुष्पहार व फटाक्यांची आतषबाजी

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या 199 व्या जयंतीनिमित्त येवदा येथील माळीपुरा परिसरात जय भवानी ग्रुपच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

शनिवारी सायंकाळी साडेसात वाजता ग्रुपच्या कार्यकर्त्यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात केली. यानंतर कार्यकर्त्यांनी फटाके फोडून उत्साहात जयंती साजरी केली. यावेळी परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमात बोलताना ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले, "महात्मा फुले यांनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. शेतकरी, कष्टकरी आणि महिलांच्या हक्कांसाठी त्यांनी आयुष्य वेचले. त्यांचा 'सत्यशोधक' विचार आजच्या पिढीने आत्मसात करणे हीच खरी आदरांजली ठरेल."

याप्रसंगी शालेय विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमानंतर उपस्थितांना प्रसाद वाटप करण्यात आला.यावेळी भा. ज. पा.अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच जय भवानी ग्रुपचे सर्व सदस्य उपस्थित होते. यात अभी प्रकाश तायडे सर गणोरकर, यश लोखंडे, हरीश मुजाळे, टिकाराम निमकर, प्रकाश बोरेकर, शिरू बोरोडे, कृष्ण हागोणे, अभी हागोने, राहुल निमकर, अभी निमकर, प्रशांत महल्ले, संजय आवारकर, विकास कवटकर, ओम थेटे, कृष्णा राऊत, विश्वकर्मा कळमकर, कृष्णा लोखंडे यांच्यासह इतर कार्यकर्ते सहभागी झाले होते.जय भवानी ग्रुप दरवर्षी महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथी साजरी करून सामाजिक प्रबोधनाचे कार्य करत आहे. "शिक्षण हाच खरा धर्म" हा फुले यांचा संदेश घराघरात पोहोचवण्याचा संकल्प यावेळी कार्यकर्त्यांनी केला.

# रायगड प्रेस क्लब पुरस्काराने गौरव; हरेश साठे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : रायगड प्रेस क्लबच्या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल पत्रकार हरेश साठे यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या पत्रकारितेतील निष्ठा, समाजाभिमुख दृष्टिकोन आणि सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला असून, यामुळे त्यांच्या कार्याला एक नवी ओळख मिळाली आहे.

या गौरवप्रसंगी दानशूर व्यक्तिमत्त्व व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी हरेश साठे यांचे विशेष अभिनंदन करत त्यांच्या कार्याचे मनापासून कौतुक केले. "पत्रकारिता ही समाजाचा आरसा असून, हरेश साठे यांनी प्रामाणिकपणे व निःपक्षपातीपणे समाजातील विविध प्रश्न मांडले आहेत. त्यांच्या कार्यामुळे समाजजागृतीला चालना मिळाली आहे," असे गौरवोद्गार त्यांनी व्यक्त केले. तसेच त्यांनी हरेश साठे यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आशीर्वाद दिले.याच वेळी हरेश साठे यांच्या वाढदिवसानिमित्तही रामशेठ ठाकूर यांनी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा देऊन दीर्घायुष्य व उत्तम आरोग्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

दरम्यान, भाजप नेते व सुप्रसिद्ध सनदी लेखापाल माजी खासदार किरीट सोमय्या यांनीही हरेश साठे यांच्या कार्याची प्रशंसा करत त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार मित्र, सामाजिक कार्यकर्ते व हितचिंतकांनी हरेश साठे यांना वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करून त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.

हरेश साठे यांनी आतापर्यंत पत्रकारितेतून समाजातील विविध समस्या, घडामोडी आणि जनहिताच्या मुद्द्यांना प्रभावीपणे वाचा फोडली आहे. त्यांच्या लेखणीमुळे अनेक प्रश्नांना न्याय मिळण्यास मदत झाली असून, त्यांच्या कार्याची दखल घेऊन मिळालेला हा सन्मान त्यांच्या पुढील कार्यासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

या दुहेरी आनंदाच्या क्षणी—पुरस्कारप्राप्ती आणि वाढदिवस—हरेश साठे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, त्यांच्या कार्याची दिशा अधिक व्यापक आणि प्रभावी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या 135 व्या जयंतीची जय्यत तयारी,सर्व समाज बांधवांचा सहभाग

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे/महागांव :(यवतमाळ )** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या 135 व्या जयंती निमित्य महागांव शहरात अभूतपूर्व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून १३५ वा जयंती सोहळा भव्य दिव्य आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यासाठी कार्यकर्त्याची जोरदार तयारी चालू आहे, शहरातील प्रमुख मार्गावर आकर्षक सजावट,रोशनाई,आणि फलक लावण्याचे काम जोमाने करण्यात येत आहेत. 14 एप्रिलला सकाळी 10:30 ला बौद्ध बांधव व समस्त ग्रामस्थ,भीम अनुयायी,बुद्ध विहारात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व तथागत गौतम बुद्ध त्यांच्या अष्टधातू मुर्तींचे पूजन करण्यासाठी जमणार



आहेत त्यानंतर पंचशील त्रिशरण ग्रहण करून, सर्व भीम अनुयायी रैलीच्या माध्यमातून बस स्थानक चौकामध्ये विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैल चित्रास माल्याअर्पण करून ध्वजारोहण करण्यात येणार आहे. तदनंतर अनुसूचित जाती मुलींच्या शाळेकडून पथनाट्य सादर करून संविधान प्रतीचे वाटप करण्यात येणार असून त्यानंतर सायंकाळी 5 वाजता बुद्ध विहार येथून प्रमुख मार्गाने भव्य मिरवणूक निघणार आहे. मिरवणुकीतील समस्त बांधवास डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैल चित्राजवळ भोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भीम जयंती मंडळाचे अध्यक्ष बंटी कावळे, कार्याध्यक्ष धम्मानंद कावळे, सचिव प्रवीण कावळे, उपाध्यक्ष बाळा डोंगरे,शाम तायवाडे,प्रशिक पाईकराव,यश भरणे, सदस्य सिद्धांत डोंगरे,अभिजीत कांबळे,सुरज चोपडे, गोकुळ भद्रे,आदर्श साळवे,गुड्डू सांगडे, सक्षम कावळे,गोलू धोटे,हर्षवर्धन कावळे, राहुल बेहडे,ऋषी स्थूल, गोलू राजनकर, इत्यादी कार्यकर्ते डॉ. बाबासाहेबआंबेडकर जयंतीची तयारी करत आहेत एकूणच महागाव शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा सोहळा अत्यंत उत्साह पूर्ण शिस्तबद्ध आणि ऐतिहासिक ठरणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

**अल्पोबहार आणि थंड पेयाची व्यवस्था**

आंबेडकरी अनुयायी आणि सर्व कार्यकर्त्यांच्या समन्वयातून आंबेडकर जयंती सोहळा साजरा होत आहे मिरवणूक सहभागी होणारे उपासक, उपासिका आणि आंबेडकरी अनुयायिंसाठी जयंत चौधरी यांचे वतीने खास मसाले भाताचे आयोजन करण्यात आले आहे.माजी उपनगराध्यक्ष उदय नरवाडे हे थंड पेय (मठ्ठा )उपलब्ध करून देणार आहेत.पत्रकार निलेश भगवानराव नरवाडे व बाळू पाटील नरवाडे, संजय नरवाडे आणि मित्र मंडळाचे वतीने माँ जिजाऊ चौकात भोजणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

# नवीमुंबईतील रिक्षा संघटनांच्या संयुक्त कृती समितीचे आंदोलनाला यश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी/मच्छिंद्र पाटील** : महाराष्ट्र शासनाने ऑटो रिक्षा चालकांच्या मागणीनुसार कल्याणकारी मंडळाची स्थापना केली परंतु सदर मंडळ स्थापन करताना कोणत्याही रिक्षा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता मंडळाच्या सदस्य नोंदणीसाठी ५००/- रु व वार्षिक३००/ रु शुल्क लागू करण्यात आले असता कल्याणकारी महामंडळाच्या माध्यमातून रिक्षा चालकांना कोणत्याही लाभ दायक योजनांचा समावेश न केल्याने रिक्षा संघटनांनी यास विरोध केला होता त्यामुळे रिक्षा चालकांनी सदस्य नोंदणीकडे पाठ फिरवली या पार्श्वभूमीवर परिवहन अधिकाऱ्यांनी रिक्षा चालकांकडून सक्तीने वसुली सुरु केली होती या पार्श्वभूमीवर ऑटो रिक्षा चालक मालक संघटना संयुक्त कृती समितीने बुधवार दिनांक ०८/०४/२०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात आंदोलनाची हाक दिली होती त्याअनुषंगाने नवीमुंबई रिक्षा टॅक्सी संघटना संयुक्त कृती समिती व अन्य विविध संघटनांच्या माध्यमातून एक दिवसीय उपोषण व धरणे आंदोलन करण्यात आले असता सदर आंदोलनाची यशस्वी सांगता झाली. नवीमुंबई सहाय्यक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्री.गजानन गावंडे यांनी



उपोषणस्थळी येऊन आश्वासन दिले कि नवीमुंबई कार्यालया मार्फत नोंदणीसाठी सक्ती करण्यात येणार नाही तसेच रिक्षा चालकांच्या अन्य मागण्यांबाबत परिवहन आयुक्तांकडे निवेदन पाठविण्यात येईल आंदोलन कर्त्या पदाधिकाऱ्यांना परिवहन अधिकारी व नवीमुंबई महानगर पालिकेचे जेष्ठ नगरसेवक तथा मा.सभागृहनेते मा.श्री.रविंद्रजी इथापे साहेब यांच्या हस्ते ज्युस देऊन आंदोलनाची सांगता करण्यात आली दरम्यान च्या काळात आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी नवीमुंबई महानगर पालिकेचे नगरसेवक व युवा नेते मा.श्री.निशांतजी भगत साहेब मारुती कोंडे. विजय पाटील. मारुती मोरे. गणेश जाधव.धनंजय पाटील. आप्पा वाडकर. ज्ञानेश्वर कोळी . संजय बाबर. पद्माकर मेहेर. नामदेव जगताप. दशरथ धोंडे. नंदा पवार. प्रदीप पाटील. सचिन लकडे विकास सूर्यवंशी. लालचंद यादव. नामदेव लंगोटे. सूर्यकांत भुजबळ. उपस्थित होते

# संघर्षातून साकारलेला शिक्षक — बापू शिंदे यांचा प्रेरणादायी जीवन प्रवास

मराठवाड्याच्या सरहद्दीवर, बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात सीना नदीच्या काठावर वसलेले साकत बुद्रुक हे छोटेसे गाव... साधारण १५०० लोकसंख्या... पण या मातीतून घडलेली माणसं मात्र असामान्य! अशाच मातीत जन्म झाला एका जिद्दी, कष्टाळू आणि स्वप्नाळू व्यक्तिमत्त्वाचा — बापू शिंदे सरांचा.

*संघर्षातून उभा राहिलेला प्रवास*

११ एप्रिल १९७५ रोजी गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर अत्यंत गरिबीच्या परिस्थितीत त्यांचा जन्म झाला. घरात हालअपेष्टा इतक्या की, कधी कधी दूधही उपलब्ध नसायचं; आई पिठात पाणी कालवून



तेच दूध म्हणून द्यायची. पण या अभावांनीच बापूंच्या आयुष्याला कणखर बनवलं.

लहानपणापासूनच कष्ट, जबाबदारी आणि जिद्द यांची साथ लाभली. प्राथमिक शिक्षण साकत येथील जिल्हा परिषद शाळेत, तर पुढील शिक्षण दहिगाव व शिराढोण येथे पूर्ण झाले. चार किलोमीटर पायी चालत शाळेत जाणारा हा विद्यार्थी पुढे १०वीत ६४.६५% गुण मिळवून उत्तीर्ण झाला.

वेटर ते विद्यार्थी — संघर्षमय शिक्षण

उच्च शिक्षणासाठी अहमदनगरला गेल्यावर जीवन अधिकच कठीण बनलं. शिक्षणासोबतच उदरनिर्वाहासाठी त्यांनी मयूर हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम सुरू केलं.

सकाळी काम, दिवसा कॉलेज आणि पुन्हा संध्याकाळी काम — असा त्यांचा दिनक्रम होता.

या काळात मिळणाऱ्या अल्प पैशातून स्वतःचा खर्च भागवून उरलेले पैसे ते घरी पाठवत असत. या त्यागातूनच त्यांच्या मनात शिक्षणाबद्दलची तळमळ अधिक दृढ होत गेली.

शिक्षणाची जिद्द आणि यश

अडचणींवर मात करत त्यांनी बारावीला ७३% गुण मिळवले आणि इतिहास विषयात पुणे विभागात प्रथम क्रमांक पटकावला. त्यानंतर त्यांनी डी.एड. पूर्ण करून शिक्षक बनण्याचे स्वप्न साकार केले.

५ मार्च १९९७ रोजी त्यांची पहिली नियुक्ती झाली आणि २४ जुलै १९९८ रोजी जिल्हा परिषदेत शिक्षक म्हणून त्यांची कारकीर्द सुरू झाली.

*एक आदर्श शिक्षक*

शिक्षक म्हणून काम करताना त्यांनी केवळ अध्यापनावर भर न देता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक उपक्रम राबवले —

शिष्यवृत्ती मार्गदर्शन

अप्रगत विद्यार्थ्यांना प्रगत बनवणे

शैक्षणिक साहित्य निर्मिती

स्काऊट-गाईड उपक्रम

गुणवत्ता विकास उपक्रम

त्यांच्या कार्यामुळे अनेक शाळांनी उल्लेखनीय प्रगती केली.

***पुरस्कार आणि गौरव***

त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत त्यांना अनेक मानाचे पुरस्कार प्राप्त झाले —

बीड जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार

विविध संस्थांचे गौरव पुरस्कार

स्काऊट-गाईड क्षेत्रातील योगदानाबद्दल सन्मान

समाजाशी नाळ जपणारे शिक्षक

बापू शिंदे सर हे केवळ शिक्षक नाहीत, तर एक समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व आहेत. गावातील प्रत्येक सामाजिक उपक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग असतो. विद्यार्थ्यांप्रमाणेच समाजालाही दिशा देण्याचे कार्य ते सातत्याने करत आहेत.

वाढदिवसानिमित्त शुभेच्छा

आज ११ एप्रिल २०२६रोजी बापू शिंदे सरांचा ५१ वा वाढदिवस...

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून उभा राहून "वेटर ते टिचर" असा प्रेरणादायी प्रवास करणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाला मनःपूर्वक सलाम! त्यांच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अखंड यश लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**शब्दांकन:**

**महादेव आमले सर**

**मा. संचालक, पतसंस्था कडा**

# श्री जोगेश्वरी काल भैरवनाथ यात्रा महोत्सव उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी: रमेश सुरशे (जालना)** : प्रतिवर्षा प्रमाणे या वर्षी देखील घनसावंगी तालुक्यातील पारडगांव येथील पुरातन काळभैरवनाथाच्या मंदिरात सात दिवस सप्ताह व भागवत कथा, व यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.मोठया उत्साहाने हा सोहळा साजरा करण्यात आला. या प्रसंगी मोठ्या संख्येने पंचक्रोशीतील भाविक भक्त उपस्थित होते. शनिवारी गावामध्ये वाजत गाजत,ढोल पथकाच्या गजरात अतिशय आनंदिमय वातावरणात (छबीना) पालखी मिरवणूक



काढण्यात आली होती. ग्रामस्थानी व महिलांनी ही आप आपल्या घरासमोर सडा रांगोळी,काढून काळभैरवनाथाचे स्वागत केले. नगर प्रदक्षिणा पूर्ण करून पालखी मंदिरात आल्या नंतर रात्री उशिरा पर्यंत भाविक दर्शन घेत होते.

रविवारी सकाळी महाअभिषेक आरती होऊन देवाला छप्पन भोगाचा नैवेद्य दाखवण्यात आला. पुरोहित राम जोशी यांच्या हस्ते आरती करण्यात आली. त्यानंतर मात्रका पूजन करण्यात आले.सकाळी ११ते १श्री . ह.भ.प. उमेश महाराज दशरथे यांचे काल्याचे कीर्तन झाले.काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी घेतला.

तसेच गावातील तरुणांनी यात्रा महोत्सवा निमित्त रक्तदान शिबिर आयोजित करून मोठ्या संख्येने या रक्तदान शिबिरात सहभाग घेतला. रक्तदान शिबिरात राम ढेरे, ज्ञानराज भालेकर, सुनील वढे,गजानन सुरशे, महेश ढेरे, अजिंक्य ढेरे, उमेश कुमावत,आदी सह गावातील तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी पुजारी गजानन जोशी, राम जोशी, महाप्रसादाचे अन्नदान शिवाजी भालेकर यांनी केले.यावेळी उपस्थित गावकरी गजानन ढेरे, विष्णू डोळझाके, प्रभाकर ढेरे, विलास आढाव, संजय भारस्कर, गजानन भारस्कर, सोमनाथ भारस्कर, गणेश सातपुते, रवींद्र ढेरे, गोवर्धन ढेरे, नाना माकोडे, विष्णू मुळे,आदी सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीवर्धनमध्ये पीएम श्री उपक्रमांतर्गत उन्हाळी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित** : पीएम श्री श्रीवर्धन नगर परिषद शाळा क्र. १ येथे दिनांक ०६ एप्रिल ते १० एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेले पाच दिवसीय "उन्हाळी शिबीर" उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिरातून विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच मनोरंजनाचा अनोखा अनुभव देण्यात आला.



"चार भिंतींतील शिक्षणापेक्षा मुक्त वातावरणात स्वतःचा शोध" या संकल्पनेवर आधारित या शिबिरामध्ये विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांचा समावेश करण्यात आला होता. शिबिर दोन सत्रांमध्ये पार पडले असून शाळेतील एकूण १३५ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

शिबिराचे उद्घाटन मा. उपनगराध्यक्ष श्री. अनंत गुरव यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मा. सभापती श्री. बाळकृष्ण गोरनाक यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

शाळेचे मुख्याध्यापक श्री. दिपक गायकवाड यांनी सांगितले की, "हे शिबिर आमच्या शालेय उपक्रमातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला. विद्यार्थ्यांना औपचारिक वर्गाबाहेर शिकण्याची संधी मिळाली असून त्यांच्या सर्जनशीलतेला, संघभावनेला आणि तंदुरुस्तीला चालना मिळाली आहे."

शिबिरात चित्रकला व रेखाचित्र, कथाकथन व सृजनात्मक लेखन, नृत्य कार्यशाळा, हस्तकला व DIY उपक्रम, कॅम्पिंग व सर्व्हायव्हल स्किल्स, गायन-वादन स्पर्धा, साहसी व मैदानी खेळ तसेच वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा अशा विविध उपक्रमांचा समावेश होता.

या उपक्रमांसाठी विविध तज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन लाभले. चित्रकलेसाठी श्री. राऊत सर, नृत्यासाठी सौ. वैद्य मॅडम, साहसी खेळांसाठी श्री. शैलेन्द्र ठाकूर, तसेच गायन-वादनासाठी श्री. वाडिया यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याशिवाय शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. गणेश कुडगावकर यांचेही मोलाचे सहकार्य मिळाले.

शिबिराचा समारोप विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंच्या प्रदर्शनाने करण्यात आला. या कार्यक्रमासाठी नगराध्यक्ष श्री. अतुलजी चौगुले तसेच केंद्रप्रमुख श्री. करंजकर यांची उपस्थिती लाभली.

या यशस्वी उपक्रमाबद्दल पालक व स्थानिक ग्रामस्थांनी शाळेचे कौतुक केले असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.

# मित्राच्या नातवाला संगणकाची भेट देऊन ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांनी जपले मैत्रीचे अतूट नाते

**दैनिक युवक आधार**

**पनवेल :** पनवेलचे ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांनी सामाजिक बांधिलकीबरोबरच मित्राच्या मैत्रीचे नाते जोपासत आपल्या एकेकाळच्या मित्राच्या नातवाला संगणकाची भेट देऊन, त्याच्या शैक्षणिक कामासाठी हातभार लावला असून, ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांनी मैत्री केवळ शब्दांपुरती न ठेवता ती त्यांनी कृतीतून जपली आहे. त्यामुळे ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे



यंदा इयत्ता दहावीची परीक्षा दिलेल्या साई संग्राम ठाकूर हा शिवसेनेचे ज्येष्ठ नेते व सामाजिक कार्यकर्ते स्वर्गीय भाऊ गोविंद ठाकूर यांचा नातू आहे. शिवसेनेचे धडाडीचे नेते व सामाजिक कार्यकर्ते भाऊ ठाकूर यांनी एकेकाळी समाज माध्यमातून समाज हिताचे कार्य केले आहे. समाज हिताचे कार्य करत असताना, स्वर्गीय भाऊ ठाकूर यांनी आपली ताकद वापरत निस्वार्थीपणे येथील नागरिकांची समाजहिताची कामे केली आहेत. याचे साक्षीदार ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील आहेत.

दरम्यान भाऊ ठाकूर यांची मुले लहान असताना, 2010 मध्ये भाऊ ठाकूर यांचे दुःखद निधन झाले. घरातला मुख्य आधारवड कोसळल्यानंतर, पत्नी सुमन भाऊ ठाकूर यांचे देखील कर्करोगाच्या आजाराने दुःखद निधन झाले. आणि काही महिन्यातच भाऊ ठाकूर यांचा लहान मुलगा आकाश ठाकूर यांचेही अपघाती निधन झाले. त्यामुळे भाऊ ठाकूर यांचा मोठा मुलगा संग्राम भाऊ ठाकूर याच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. मात्र या अशा परिस्थितीत रायगड व नवी मुंबईमध्ये प्रसिद्ध असलेले ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांनी आपला मित्र भाऊ ठाकूर यांच्या कुटुंबाला आधार देऊन त्यांच्या कुटुंबाच्या पाठीशी सावलीसारखे उभे राहून आपल्या मैत्रीचे अतूट नाते जपले आहे.

आज गेली 15 ते 16 वर्ष ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील हे त्यांच्या कुटुंबासोबत सावली सारखे उभे आहेत. आजच्या स्वार्थी आणी मतलबी जगात मित्र हयात नसताना मित्रता जपणारे जेष्ठ पत्रकार माधव पाटील यांच्यासारखी माणसे खूप कमी पाहायला मिळतात, मित्राचे निधन झाले असले तरी त्या मैत्रीची नाळ आजही तितक्याच जिव्हाळ्याने जपणारे जेष्ठ पत्रकार माधव पाटील यांनी पुन्हा एकदा मैत्रीच्या नात्याचा आदर्श दाखविला आहे. त्यांनी आपला मित्र स्वर्गीय भाऊ ठाकूर यांच्या कुटुंबाला वेळोवेळी आधार दिला असून, यावेळी मित्राच्या नातवाला शैक्षणिक कामात उपयोगी पडणाऱ्या संगणकाची भेट देऊ केली आहे. या संगणकाच्या भेटवस्तूमुळे साई ठाकूरच्या शिक्षणाला मोठा हातभार लागणार आहे. ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांची ही मित्रता इतरांसाठी आदर्शवत असून ती सर्वांनाच प्रेरणादायी ठरेल, हे तितकेच खरे आहे!

# मालेगावात शिवसेनेची संघटन बैठक; कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण

### "संघटन मजबूत करण्यासाठी प्रत्येकाने पुढे यावे" — प्रदीप पाटील कुटे यांचे भावनिक आवाहन

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : मालेगाव तालुक्यात शिवसेना पक्ष संघटन अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने येत्या दि. १३ एप्रिल २०२६ (सोमवार) रोजी दुपारी ३ वाजता नगर पंचायत सभागृह, मालेगाव येथे भव्य तालुका संघटन बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस शिवसेना नेत्या भावनाताई गवळी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तसेच लोकसभा संपर्कप्रमुख व माजी आमदार राजनजी साळवी यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडणार आहे.

या महत्वपूर्ण बैठकीस शिवसेना जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी महादेवराव ठाकरे, नगराध्यक्ष ओम भाऊ खुरसडे, उपाध्यक्ष राधाताई महादेव खवले तसेच सर्व सभापती, नगरसेवक, सर्कलप्रमुख, उपसर्कल प्रमुख आणि शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.



तालुक्यातील सर्व उपतालुका प्रमुख, सर्कलप्रमुख, उपसर्कल प्रमुख व कार्यकर्त्यांना कळविण्यात आले आहे की, प्रत्येकाने आपल्या सर्कलमधील किमान ५ ते १० कार्यकर्त्यांसह उपस्थित राहणे अपेक्षित आहे. पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, प्रत्येक पदाधिकाऱ्याने जबाबदारीने सहभाग नोंदवणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, कार्यक्रमाच्या किमान ३ तास आधी उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कार्यक्रमस्थळी सर्वांची वेळेनुसार नोंद घेतली जाणार असून, उपस्थिती नोंदवून सही केल्याशिवाय कोणालाही परवानगी दिली जाणार नाही. तसेच, प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपल्या सर्कलमधील शिवसैनिकांना कार्यक्रमाचे आमंत्रण पोहोचवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

> **"शिवसेना पक्ष संघटन अधिक सक्षम करण्यासाठी ही बैठक अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवून वेळेआधी उपस्थित राहावे व अधिकाधिक कार्यकर्त्यांना सोबत आणावे. संघटन मजबूत असेल तरच आपण जनतेचे प्रश्न प्रभावीपणे सोडवू शकतो."**
>
> **— प्रदीप पाटील कुटे**
> **शिवसेना तालुका प्रमुख, मालेगाव**

या बैठकीत आगामी निवडणुका, पक्ष संघटनाची रणनीती तसेच स्थानिक प्रश्नांवर सविस्तर चर्चा होणार असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे मालेगाव तालुक्यातील शिवसैनिकांमध्ये या बैठकीबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी पुढाकार घेणारे शिवसेना तालुका प्रमुख प्रदीप पाटील कुटे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना वैयक्तिकरित्या संपर्क साधून उपस्थितीबाबत सूचना दिल्या आहेत.

# दरवर्षीप्रमाणे यंदाही सहा दिवसांचा भव्य भीमोत्सव साजरा होणार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : दरवर्षीप्रमाणे यंदाही सहा दिवसांचा भिमोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असल्याची माहिती भाजपचे रायगड जिल्हा सरचिटणीस व पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेता ॲड. प्रकाश बिनेदार यांनी दिली आहे.



भारतीय जनता पार्टी नवीन पनवेल आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती नवीन पनवेल व आठ सामाजिक संस्था यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सहा दिवसांचा भव्य जयंती भीमोत्सव १० एप्रिल ते १५ एप्रिलपर्यंत उत्साहात साजरा करण्यात येणार येणार आहे. या महोत्सवामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन, विविध सामाजिक व प्रबोधनात्मक कार्यक्रम तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून सामाजिक ऐक्य, प्रबोधन आणि सांस्कृतिक परंपरेचा संगम साधणे हा या भीमोत्सवाचा मुख्य उद्देश असल्याचे ॲड. प्रकाश बिनेदार यांनी सांगितले.

या महोत्सवाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, माजी सभागृहनेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमिला पाटील, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी शहर अध्यक्ष अनिल भगत, बिल्डर ॲण्ड डेव्हलपर्सचे श्रीपाद भांडारी, स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम, महिला व बाल कल्याण सभापती ममता म्हात्रे, ज्येष्ठ नेते जगदीश घरत, भारतीय बौद्ध महासभेचे प्रदेश अध्यक्ष महेंद्र मोरे, नगरसेवक दशरथ म्हात्रे, सुमित झुंझारराव, कामगार नेते अनिल जाधव, अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अकबर सय्यद यांच्यासह लोकप्रतिनिधी अनेक मान्यवर उपस्थित राहणार असल्याचेही ॲड. प्रकाश बिनेदार यांनी सांगितले.

त्या अनुषंगाने दिनांक १० एप्रिल ते १३ एप्रिल दरम्यान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा, विविध मैदानी खेळांच्या स्पर्धा, महिलांसाठी संगीत खुर्ची, खेळ पैठणीचा तसेच ज्येष्ठ माता-पित्यांचा सन्मान सोहळा इत्यादि स्पर्धात्मक आणि सन्माननीय कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. जयंतीच्या दिवशी म्हणजेच मंगळवार दिनांक १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता धम्म ध्वजारोहण, १०.३० वाजता सुप्रसिध्द प्रवचनकार, भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक आयु. कल्पेश कांबळे यांचे धम्म प्रवचन आणि स्नेहभोजनाचा कार्यक्रम बुध्दगया प्रतिष्ठान अंतर्गत नवीन पनवेल येथील बिनेदार कॉर्नर जवळील आम्रपाली बुध्द विहार येथे होणार आहे. तसेच त्याचदिवशी सायंकाळी ०६ वाजता महाराष्ट्राचे ख्यातनाम गायक आनंद शिंदे यांचा 'शिंदेशाही बाणा' हा भीमगीतांचा बहारदार कार्यक्रम तर बुधवार दिनांक १५ एप्रिल रोजी सायंकाळी ०६ वाजता महाराष्ट्राचे सुप्रसिध्द गायक जोडी साजन-विशाल यांचा भीमगीतांचा भरगच्च कार्यक्रम सिडको क्रिडांगण, बिनेदार मैदान, जय अंबे माता मंदिराशेजारी, सेक्टर २, नवीन पनवेल.(पूर्व) या ठिकाणी आयोजित होणार आहे. या उपक्रमात नागरिकांचा, विविध सामाजिक संघटनांचा तसेच युवकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग अपेक्षित आहे. नवीन पनवेल परिसरात दरवर्षीप्रमाणे यंदाही हा भीमोत्सव मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा होणार असून संपूर्ण परिसरात उत्सवी वातावरण निर्माण होणार आहे, असेही त्यांनी नमूद करतानाच या भीमोत्सवाला सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन या महोत्सवाचे आयोजक व पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेता ॲड. प्रकाश बिनेदार यांनी केले आहे.

# जय भवानी महाविद्यालयात श्री .भागवत जाधव यांचा सेवापूर्ती निमित्त सेवागौरव

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी )** : पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयातील कनिष्ठ लिपीक श्री. भागवत बाबासाहेब जाधव हे नियत वयोमानानुसार दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले . त्यांच्या सेवापूर्ती निमित्त महाविद्यालयात त्यांचा सेवागौरव करण्यात आला. या सेवागौरव समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन माजी प्रचार्य प्रा.मोहन परजने व जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर गढी चे प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते. तर व्यासपीठावर श्री.बप्पासाहेब जाधव, स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य श्री.दिलीपराव जाधव, माजी प्राचार्य प्रा.डॉ.सय्यद शौकत सह आदी मान्यवरांची उपस्थिती होती. प्रारंभी प्रस्ताविक प्रा.डॉ.वंदन जाधव यांनी केले. या प्रसंगी वेदविद्या शिक्षणात अतिउत्तम ठरणारा विद्यार्थी धसे हर्ष या विद्यार्थ्याचा मान्यवरांच्या शुभ हस्ते सत्कार करण्यात आला. सत्कारमुर्ती श्री.भागवत जाधव यांचा सर्व मान्यवरांच्या शुभ हस्ते सपत्नीक शाल, पुष्प गुच्छ, सन्मान चिन्ह व संपूर्ण कपड्याचा आहेर देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी माजी प्राचार्य डॉ.सय्यद शौकत, प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य प्रा.मोहन परजणे यांनी श्री.भागवत जाधव यांच्या कार्यालयीन कामकाजाचे अनुभव सांगुन त्यांच्या भावी आयुष्याला शुभेच्छा! दिल्या. मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी श्री.भागवत जाधव यांनी महाविद्यालयात केलेल्या कामाचे कौतुक करून त्यांची महाविद्यालयास उणिव भासेल असे सांगुन त्यांच्या कामाचे कौतुक करून त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.



सत्काराला उत्तर देताना श्री.भागवत जाधव यांनी सांगितले की मी याच महाविद्यालयात शिक्षण घेतले व या महाविद्यालयात सेवा करण्याची मला शिक्षण महर्षी माजी मंत्री मा.शिवाजीरावदादा पंडित व माजी आ.अमरसिंह भैय्या साहेब पंडित व मा.जयभाऊ पंडित यांच्या मुळे संधी मिळाली, हे मी कधी ही विसरणार नाही. काम करताना सर्वांनी मला सहकार्य केले. हे मी कधी ही विसरणार नाही. काम करताना माझ्याकडून कोणाचे मन दु:खावले असेल तर मला मोठ्या मनाने माफ करावे असे सांगताना त्यांना आपले आश्रु आवरता आले नाहीत. ते भावनिक झाले होते. शेवटी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांनी श्री.भागवत जाधव यांच्या प्रमाणिक कामाचे कौतुक करून त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा! दिल्या. व जेव्हा जेव्हा महाविद्यालयाला गरज पडेल तेव्हा हक्काने महाविद्यालयाच्या कामास मदत करावी असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती प्रा.डॉ.कल्पना घारगे यांनी केले तर आभार कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे यांनी मानले या प्रसंगी माजी कार्यलयीन अधिक्षक श्री. आबेद चाऊस, श्री.अरुण काका मठपती, इंजि. राज जाधव श्रीमती रेखाताई जाधव व त्यांचे स्नेही, सर्व प्राध्यापक वृंद, सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर 'बहु-संस्थात्मक आपत्ती सज्जता सराव' संपन्न

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** कोणत्याही नैसर्गिक किंवा तांत्रिक आपत्तीचा सामना करण्यासाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (NMIA) किती सज्ज आहे, याचे मूल्यमापन करण्यासाठी दोन दिवसीय भव्य 'बहु-संस्थात्मक आपत्ती सज्जता सराव' नुकताच यशस्वीरित्या पार पडला. 'राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण' (NDMA) आणि 'जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण' (DDMA) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सरावात केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध यंत्रणांनी आपला सहभाग नोंदवून आपत्कालीन सज्जतेचे दर्शन घडविले.

विमानतळ परिसरात आयोजित या दोन दिवसीय कार्यक्रमाची सुरुवात 'टेबलटॉप सराव' या सत्राने झाली, ज्यामध्ये आपत्तीच्या वेळी करावयाचे नियोजन आणि विविध विभागांमधील समन्वयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यानंतर बचाव कार्यासाठी उपयुक्त ठरणारी अत्याधुनिक साधने आणि विशेष वाहनांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. या सरावाचा मुख्य भाग म्हणजे 'पूर्ण-स्तरीय प्रात्यक्षिक सराव' (Mock Drill) होय. या माध्यमातून प्रत्यक्ष घटनेच्या वेळी दिला जाणारा प्रतिसाद, लोकांचे सुरक्षित स्थलांतर, शोध व बचाव कार्य, धोक्यांचे व्यवस्थापन आणि आपत्कालीन कृती केंद्रांचे (EOC) कार्यान्वयन या बाबींचे प्रत्यक्ष मैदानावर सूक्ष्म मूल्यमापन करण्यात आले.

या सरावासाठी एक अत्यंत गुंतागुंतीची आणि 'मल्टी-हॅजार्ड' परिस्थिती निर्माण करण्यात आली होती, ज्यामध्ये "चक्रीवादळ, आगीच्या घटना आणि धोकादायक किरणोत्सर्गी पदार्थांची गळती" अशा आव्हानांचा समावेश होता. या कठीण परिस्थितीत धोक्यांचे नियंत्रण करणे, आगीपासून बचाव, बहुमजली इमारतींमधून नागरिकांचे स्थलांतर करणे, संवाद यंत्रणेची कार्यक्षमता तपासणे, संसाधनांची जुळवाजुळव आणि प्रत्यक्ष घटनास्थळावरील सुरक्षा सुनिश्चित करणे, यांसारख्या कार्यपद्धतींची कठोर चाचणी घेण्यात आली.






दोन दिवस चाललेल्या या महत्त्वपूर्ण उपक्रमाच्या दुसऱ्या दिवशी डॉ.दिनेशकुमार अस्वाल आणि मेजर जनरल अजय वर्मा (NDMA) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या मोहिमेत केंद्र व राज्य शासनाचे विविध विभाग, 'राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल' (NDRF), सशस्त्र दले, 'केंद्रीय राखीव पोलीस दल' (CRPF), 'जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण' (DDMA) आणि 'अणुऊर्जा विभाग' (DAE) यांतील अधिकाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. तसेच नवी मुंबई महानगरपालिका (NMMC), पनवेल महानगरपालिका (PMC), सिडको (CIDCO) आणि 'केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल' (CISF), अग्निशमन दल, नागरी संरक्षण दल, आपदा मित्र, आरोग्य विभाग, प्रसारमाध्यमे यांसारख्या स्थानिक व तांत्रिक संस्थांनीही यात मोलाची भूमिका बजावली.

या सरावादरम्यान तातडीचे वैद्यकीय सहाय्य पुरविण्यासाठी कळंबोली येथील व्हाईट लोटस हॉस्पिटल, वाशीचे फोर्टिस हॉस्पिटल आणि सीबीडी बेलापूर येथील अपोलो हॉस्पिटलची पथके तैनात होती. या व्यापक सरावामुळे विविध संस्थांमधील परस्पर समन्वय अधिक दृढ होण्यास मदत झाली असून यंत्रणेतील संभाव्य त्रुटी शोधणे शक्य झाले आहे. तीव्र हवामान आणि एकापाठोपाठ उद्भवणाऱ्या विविध धोक्यांमुळे निर्माण होणाऱ्या गुंतागुंतीच्या आपत्कालीन परिस्थितींना अधिक प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी विमानतळाची सज्जता वाढविणे, हा या सरावाचा मुख्य उद्देश होता.

या यशस्वी कार्यक्रमात रायगडचे जिल्हाधिकारी किशन जवळे, NDMA चे सदस्य डॉ. दिनेशकुमार अस्वाल, मेजर जनरल अजय वर्मा, मुख्य सल्लागार (CDRN) डॉ. विनोद कौशिक, अणुऊर्जा विभागाचे सदस्य सचिव (संकट व्यवस्थापन) सरस सेठ, उपसचिव दत्तात्रय कदम, कोकण विभागीय माहिती प्र.उपसंचालक मनोज सानप, पनवेल उपविभागीय अधिकारी पवन चांडक, तहसिलदार श्रीमती भामरे, पनवेल महानगरपालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.आनंद गोसावी, CRPF चे समादेशक अमर सिंग, NDRF चे दुसरे समादेशक दीपक तिवारी, स्फोटक नियंत्रक (PESO) अमित कुमार, CISF चे सहाय्यक समादेशक संजय तसेच मंत्रालयातील कक्ष अधिकारी योगिता गवथे आणि प्रकल्प अधिकारी श्रीदत्त कामत, रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक आदी मान्यवरांचा समावेश होता,या मोठ्या प्रमाणावरील आपत्ती सज्जता सरावाच्या यशस्वी सांगतेमुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची प्रतिसाद कार्यपद्धती आणि कार्यात्मक सज्जता अधिक प्रबळ झाल्याचे दिसून आले आहे.

---

## देवदुत ओमप्रकाश शेटे यांनी शाळेसाठी पुढाकार घेऊन चिमुकल्यांसाठी संजीवनी बनावं !

### काळेगाव थडी जिल्हा परिषद शाळा मरणासन्न अवस्थेत; झाडाखाली भरतेय वर्ग :- डॉ.गणेश ढवळे



**दैनिक युवक आधार**

**पाटोदा(प्रतिनिधी):** माजलगाव तालुक्यातील काळेगाव थडी येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत अत्यंत जीर्ण अवस्थेत असून, विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून शिक्षण घ्यावे लागत आहे. इमारत कधी ही कोसळण्याची भीती असल्याने सध्या विद्यार्थ्यांचे वर्ग झाडाखाली भरत असल्याची गंभीर परिस्थिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू देवदुत म्हणून ओळखले जाणारे ओमप्रकाश शेटे यांनी या शाळेसाठी 'देवदूत' ठरून नव्या इमारतीसाठी शासन दरबारी पाठपुरावा करून शाळेतील विद्यार्थ्यांसाठी संजीवनी बनावं अशी मागणी केली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला असुन नविन शाळा इमारतीसाठी तातडीने निर्णय घेण्याची गरज असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे. शाळेची इमारत १९६३ साली विटा आणि चुन्यापासून बांधलेली असून सध्या ती अत्यंत धोकादायक अवस्थेत आहे. भिंतींना मोठे तडे गेले आहेत, पत्रे गंजून गळती होत आहे, तसेच सिमेंटचे खपले कोसळत आहेत. अनेकदा वर्गात साप व विंचू आढळल्याच्या घटनाही घडल्या आहेत. "इमारत कधी कोसळेल याचा नेम नसल्याने विद्यार्थ्यांना झाडाखाली बसवून शिक्षण द्यावे लागत आहे. वारंवार वरिष्ठ कार्यालयाकडे पाठपुरावा करून ही दखल घेतली जात नाही," अशी खंत मुख्याध्यापक बाळासाहेब काकडे यांनी व्यक्त केली. येथे मुलभूत सुविधांचा अभाव असुन शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आगाजी तौर यांनी सांगितले की, पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही, शौचालयांची कमतरता, पोषण आहारासाठी स्वतंत्र स्वयंपाकगृह नाही, या सर्व बाबींमुळे विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**"ज्ञान मंदिराकडेही लक्ष द्यावे"**

माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तम पुरी, शुक्लतीर्थ व वांगी देवस्थानांच्या विकासासाठी ओमप्रकाश शेटे यांनी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला आहे. त्याच प्रमाणे जिल्हा परिषद शाळांसारख्या "ज्ञान मंदिरां" कडेही लक्ष देऊन काळेगाव थडी सह इतर जीर्ण शाळांच्या इमारतींसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

---

## कोयाळी ( बु ) येथील श्री .ज्ञानेश्वर आत्माराम भिसडे यांना नाशिक येथे आदर्श शेतकरी कृषी गौरव पुरस्कार 2026 प्रदान

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/ रणजीतसिह ठाकुर** : रिसोड तालुक्यातील मौजे. कोयाळी ( बु ) येथील आदर्श शेतकरी, बिनविरोध तथा तंटामुक्ती अध्यक्ष नेहमीच समाजसेवेत स्वतःला वाहून घेऊन सक्रिय असणारे वारकरी परंपरेने वाटचाल करत आज श्री.ज्ञानेश्वर भिसडे यांना आज नाशिक येथे 10 एप्रिल रोजी जय किसान फार्मर्स फोरम व आमची माती आमची माणसं यांच्या संयुक्त विद्यमाने भारताचे पाहिले कृषीमंत्री कृषी अभ्यासक बहुजन समाजाचे पुढारी कृषीरत्न डॉ. पंजाबराव देशमुख उपाख्य भाऊसाहेब यांच्या स्मृतिदिना निमित्त दि. १० एप्रिल २०२६ ला सकाळी ११ वाजता नाट्यगृह, सार्व. वाचनालय, नेहरू गार्डन हॉल मध्ये अनेक नामांकित मान्यवरांच्या हस्ते श्री. ज्ञानेश्वर आत्माराम भिसडे व त्यांच्या सपतनिक यांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषी गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमा पूजन दीपप्रज्वलनाने तसेच स्वागत गीताने कार्यक्रमास सुरुवात झाली, अध्यक्ष श्री.आबा मोरे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमास सुरुवात



झाली,आपली माती आपली माणसं संपादक श्री. संजय जी जाधव सर यांनी प्रस्तावना केली, यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. आबासाहेब मोरे ( श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, दिंडोरी ) यांनी उपस्थित महाराष्ट्रातील सर्व शेतकरी बांधवाना सेंद्रिय शेती करून विषमुक्त शेती करावी असे सांगितले, सोबतच जमिनीची पोषकता वाढवावी, शेणखताचा वापर करावा, अशा महत्वाच्या विषयावर प्रभोधन केले, व उत्कृष्ट शेती करणाऱ्या महाराष्ट्रातील मोजक्याच शेतकरी बांधवाना हा सन्मान मिळाला आहे, वाशिम जिल्हामधून मालेगाव तालुक्यातील श्री.संदीप विश्वनाथ टोचर रा. राजुरा. ता. मालेगाव तर रिसोड तालुक्यातील श्री. ज्ञानेश्वर भिसडे या दोन रत्नांना हा पुरस्कार मिळाला आहे, संजय लाड सर ( सातारा ) यांचे वेळोवेळी मार्गदर्शन घडले म्हणूनच आज मी ह्या पुरस्काराचा मानकरी ठरलो असे ज्ञानेश्वर भिसडे म्हणाले, तसेच या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून मा. ॲड. नितीन ठाकरे(सरचिटणीस, मराठा विद्याप्रसारक समाज संस्था) मा. उद्धवजी आहेर(चेअरमन, आनंद ॲग्रो ग्रुप)मा. डॉ. जयराम पुरकर (जेष्ठ कृषी शास्त्रज्ञ)मा. रमेश पाटील (संचालक, आनंद ॲग्रो)

मा. पंढरीनाथ थोरे (मा. अध्यक्ष, जि. प. नाशिक) मा. अर्जुन तोखणे (संशोधक, गावखेती योजना) मा. डॉ. संतोष जाधव (राष्ट्रीय सेवा प्रमुख विविध भारती)मा. सदुभाऊ शेळके (सेंद्रिय शेतीतज्ञ) मा. पांडुरंग चव्हाण (ज्येष्ठ उद्योजक) यांची प्रमुख उपस्थिती लाभली, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमा पूजन दीपप्रज्वलनाने,स्वागत गीताने, तसेच शेतकरी गीताने कार्यक्रमास सुरुवात झाली, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायिका शुभदा महाजन, व मोहन कुमार निकम यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला सुंदर अशा गायनाने वातावरण समृद्ध आनंदमय केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. तुषार वाघुळदे यांनी केले, या सोहळयात शेतकऱ्यांचा सन्मान करून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

---

## नागपुरात 'मिस आणि मिसेस महाराष्ट्र २०२६'ची धूम

### गौतमी पाटीलच्या रॅम्प वॉकने वाढविली स्पर्धेची रंगत!

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर:**स्मृती एंटरप्रायजेसच्या वतीने आयोजित 'द ज्वेल वन पेजेंट: मिस आणि मिसेस महाराष्ट्र २०२६'चे दिमाखदार चौथे ऑडिशन नुकतेच नागपुरात पार पडले. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरली ती महाराष्ट्राची लाडकी नृत्यांगना गौतमी पाटील. यावेळी तिने केवळ स्पर्धकांचे मनोबलच वाढवले नाही, तर स्वतः रॅम्प वॉक करत उपस्थितांची मने जिंकली.

**स्वप्नांचा पाठलाग करा: गौतमी पाटील यांचा संदेश**

व्यासपीठावरून स्पर्धकांशी संवाद साधताना गौतमी पाटील म्हणाली की, "स्त्रियांनी आपल्या स्वप्नांचा पाठलाग करताना स्वतःच्या अंतरात्म्याशिवाय कुणाचेही ऐकू नये." स्त्रीशक्तीचा सन्मान करणाऱ्या या मंचावर तिने स्पर्धकांचा उत्साह द्विगुणित केला.

**परीक्षक आणि मान्यवरांची उपस्थिती**

या ऑडिशनसाठी परीक्षक म्हणून प्रसिद्ध अभिनेते व नृत्य दिग्दर्शक आशिमिक कामठे आणि आंतरराष्ट्रीय कोरिओग्राफर जयेश पाटील उपस्थित होते. त्यांच्यासोबत गौतमी पाटीलने केलेल्या रॅम्प वॉकने कार्यक्रमात वेगळीच रंगत भरली. याव्यतिरिक्त ज्युरी पॅनेलमध्ये मिसेस हेरिटेज इंडिया सौम्या नायर, गौरी ढेकेकर आणि कोरिओग्राफर दिनेश हाडके यांचा समावेश होता. सोबतच या स्पर्धेसाठी नगरसेविका मनपा नागपूर परिणीता फुके व लॉ कमिटीच्या चेअरमन कु.निधी तेलगोटे या मान्यवर म्हणून उपस्थित होत्या.

**संधींचा खजिना: स्मृती एंटरप्रायजेसचा**



**पुढाकार**

स्मृती एंटरप्रायजेसचे आयोजक आधार दादा शिंदे आणि स्मृती बोनगे यांनी या स्पर्धेच्या माध्यमातून महिलांना कला क्षेत्रात कशा प्रकारे व्यासपीठ उपलब्ध करून दिले जात आहे, याची माहिती दिली. नवी मुंबई, पुणे आणि कोल्हापूर येथील यशस्वी ऑडिशन्सनंतर नागपुरातही या स्पर्धेला उदंड प्रतिसाद मिळाला.

विशेष घोषणा: 'जयोस्तुते' गाण्याचे पोस्टर लाँच

या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे पेंटेन स्टुडिओज आणि स्मृती एंटरप्रायजेस यांच्या संयुक्त विद्यमाने साकारल्या जाणाऱ्या 'जयोस्तुते' या अल्बम साँगच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले.

मोठी संधी: अंतिम फेरीत निवडल्या जाणाऱ्या ४० स्पर्धकांना या गाण्यात काम करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.

ब्रँड जाहिराती: या स्पर्धेतील सहभागींना विविध नामांकित ब्रँड्सच्या जाहिरातींमध्येही झळकण्याची संधी मिळणार असल्याचे स्मृती बोनगे यांनी सांगितले.

पेंटेन स्टुडिओजची टीम आणि अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. ही केवळ एक सौंदर्य स्पर्धा नसून महिलांसाठी संधींचा 'खजिना' असल्याचे सांगत, जास्तीत जास्त महिलांनी यात सहभागी व्हावे असे आवाहन यावेळी करण्यात आले.

---

## पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला खो खो स्पर्धेत एस . एन . डी .टी . महिला विद्यापीठ संघास ऐतिहासिक उपविजेतेपद

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी/ विलास गायकवाड** : नुकत्याच रीवा, मध्य प्रदेश येथे पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला खो खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत राजस्थान, मध्यप्रदेश, गुजराथ आणि महाराष्ट्र या पश्चिम विभागाच्या राज्यातील ६४ विद्यापीठांचे संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेतील पहिले चार संघ अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत पश्चिम विभागाचे प्रतिनिधित्व करतात असा नियम आहे. या स्पर्धेत एस. एन. डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई संघाने विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेची पात्रता फेरी पार करून अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला स्पर्धेसाठी पात्रता मिळविली आहे.



या स्पर्धेच्या पात्रता फेरीमध्ये या संघाला पाच सामने खेळावे लागले. हे सर्व सामने एस. एन. डी.टी. संघाने डावाच्या फरकाने जिंकून या स्पर्धेतील आपले वर्चस्व सिद्ध केले. पात्रता फेरीत पी. डी. यू. एस. विद्यापीठ सिक्कर, एम. डी. एस. विद्यापीठ अजमेर, स्वर्णीम क्रीडा विद्यापीठ, गुजराथ, यजमान ए. पी. एस. विद्यापीठ, रीवा आणि साऊथ गुजराथ विद्यापीठ या संघांचा दणदणीत पराभव करून "ब" गटाचे विजेतेपद पटकावून पात्रता फेरीत रुबाबात प्रवेश केला. यानंतर खेळल्या गेलेल्या बाद फेरीच्या सामन्यामध्येही या संघाने सुंदर खेळ करत पहिल्या सामन्यात गत वर्षीच्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेतील उपविजेत्या सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ संघाचा १० विरुद्ध ९ असा एक गुण आणि दीड मिनिट राखून खळबळ माजवून दिली. तर उपांत्य सामन्यात मुंबई विद्यापीठ संघाचा ९ विरुद्ध ८ असा एक गुण आणि पावणे दोन मिनिट राखून अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश केला. अंतिम सामना बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठ यांच्या बरोबर झाला. या सामन्यातही एस. एन. डी.टी. च्या खेळाडूंनी आप-आपसात चांगला समन्वय राखत चांगली सुरवात केली. परंतु तीन गुणांच्या फरकाने त्यांना हा सामना ८ विरुद्ध ५ असा तीन गुणांनी गमवावा लागला, आणि सरीता दिवा हिच्या नेतृत्वाखाली एस. एन. डी.टी. महिला विद्यापीठ मुंबई संघाला शेवटी उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

या उपविजेतेपदाच्या कामगिरीमुळे एस. एन. डी.टी. संघ प्रथमच अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट आक्रमक खेळाडूचा पुरस्कार एस. एन. डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई संघाची नाशिकच्या खो खो प्रबोधिनीची खेळाडू कुमारी ज्योती मेढे हिने पटकावला. हा पुरस्कार मिळविणारी ज्योती ही नाशिकची पहिली महिला खेळाडू ठरली आहे. सरीता दिवा, ज्योती मेढे, दिदी ठाकरे, ऋतुजा सहारे, विद्या मिरके,तेजस्वी पोखरकर यांच्या अष्टपैलू खेळाला सीमा मालुसरे, गौरी काशिद, सृष्टी बांडे, अर्चना वनमाने,सपना रूपनवर,रितिका चोरगे, वैष्णवी परब, रिया कदम आणि वैदेही बहिरा यांनी चांगली साथ दिली. हा संघ दिनांक १९ ते २३ एप्रिल दरम्यान मुंबई येथे त्यांच्याच विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला खो खो स्पर्धेत प विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

या पश्चिम विभागीय विद्यापीठ स्पर्धेआधी एस. एन. डी.टी. संघाचे सराव शिबीर नाशिकच्या क्रीडा प्रबोधीनीच्या जिल्हा क्रीडा संकुल येथील खो-खो मैदानात पार पडले होते. या शिबिराचा चांगला फायदा झाला आहे आणि त्यामुळेच आम्हाला या स्पर्धेमध्ये उपविजेतेपदाला गवसणी घालता आली आणि अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धामध्ये प्रवेश मिळाला अश्या भावना या संघाची कर्णधार सरिता दिवा हिने व्यक्त केला आहे.

# बावनथडी प्रकल्पग्रस्तांच्या गावात जिल्हाधिकाऱ्यांची खुली सभा; मागण्या न सुटल्यास टोकाच्या आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी स्वप्नील काटवले**
**लाखनी भंडारा** : बावनथडी प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्या जलसमाधी आंदोलनानंतर प्रशासनाला जाग आली असून, जिल्हाधिकारी सावनकुमार यांनी थेट प्रकल्पग्रस्तांच्या कमकासुर (जुने गावठाण) येथे भेट देत आंब्याच्या झाडाखाली खुली सभा घेतली. जवळपास दोन तास चाललेल्या या बैठकीत त्यांनी आदिवासी बांधवांच्या समस्या शांतपणे ऐकून घेत तातडीने सोडवणुकीचे आश्वासन दिले.

सभेच्या प्रारंभी 'धरती आबा' बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेसह महात्मा ज्योतिबा फुले व छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुस्तक देऊन जिल्हाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशनचे राज्याध्यक्ष वैभव चोपकर यांनी प्रास्ताविक करत मागण्यांचे निवेदन सादर केले व प्रत्येक मुद्दा सविस्तर स्पष्ट केला. यानंतर उपस्थित प्रकल्पग्रस्त नागरिकांनीही आपले प्रश्न थेट जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडले.

या सभेत गेल्या ४० ते ५० वर्षांपासूनच्या वनवासाच्या वेदनांचा जणू उद्रेकच झाला. काही आदिवासी बांधवांनी आक्रमक भूमिका घेत संताप व्यक्त केला, तर काहींनी अश्रूंनी आपली व्यथा मांडली. दीर्घकाळ सहन केलेल्या अन्यायाचा पाढा यावेळी वाचण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांनी संवेदनशील भूमिका घेत सर्वांचे म्हणणे ऐकून



घेतले व जिल्हा प्रशासनाच्या अखत्यारीतील मागण्या लवकर पूर्ण करण्याचे तसेच शासन पातळीवरील मागण्यांसाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

सीतेकसा, सुसूरडोह व कमकासुर या तिन्ही गावांतील सुमारे एक हजार नागरिकांची मोठी उपस्थिती या सभेला होती. प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीच्या वतीने अशोक उईके, किशोर उईके यांच्यासह शेकडो नागरिक उपस्थित होते.

दरम्यान, जिल्हाधिकारी थेट गावात येऊन संवाद साधल्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या अपेक्षा उंचावल्या असल्या तरी मागण्या वेळेत पूर्ण न झाल्यास टोकाचे पाऊल उचलून 'मरण स्वीकारण्याचा' इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला. प्रशासनाने या इशाऱ्याची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात आली.

**प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे :**

आर्थिक मोबदल्यांचे पुनर्मूल्यांकन, घरासाठी एकरकमी आर्थिक मदत, रोजगार हमी योजनेअंतर्गत निधी, नोकरीत ५० टक्के आरक्षण, व्याजासह भूखंडाची रक्कम, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, पुनर्वसन स्थळी १८ नागरी सुविधा पूर्ण करणे, वनहक्कांतर्गत जमीनपट्टे, आदिवासी सांस्कृतिक हक्कांचे संरक्षण, महिलांसाठी स्वयंरोजगार व प्रशिक्षण, भूमिहीन कुटुंबांसाठी विशेष पॅकेज, मासेमारीसाठी आर्थिक मदत आदी मागण्या यामध्ये समाविष्ट आहेत.

यावेळी राजेंद्र पटले, मुन्ना पुंडे, रोहित मरसकोल्हे, बेनी धूर्वे, संगीता धूर्वे, सुरेश तडोसे, मनोज उईके यांच्यासह मोठ्या संख्येने प्रकल्पग्रस्त पुरुष व महिला उपस्थित होते.

**अधिकाऱ्यांची उपस्थिती :**

जिल्हाधिकारी सावनकुमार, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) लीना फलके, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) जे. पी. लोंढे, उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार उपेश अंबादे, नायब तहसीलदार संजय जांभुळकर, कार्यकारी अभियंता पाटील, उपविभागीय अभियंता प्राजक्त मेश्राम, निबंधक हुमणे आदी अधिकारी उपस्थित होते.

आदिवासी प्रकल्प अधिकारी गैरहजर; संताप व्यक्त

दरम्यान, संबंधित आदिवासी प्रकल्प अधिकाऱ्यांनी बैठकीला गैरहजेरी लावल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. कोणताही प्रतिनिधीही उपस्थित नसल्याने अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर निर्णय होऊ शकला नाही. संतप्त नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी केली.एकूणच, जलसमाधी आंदोलनानंतर प्रशासनाने घेतलेली ही दखल सकारात्मक मानली जात असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीवरच प्रकल्पग्रस्तांचा विश्वास टिकणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# भारताला युवा नेतृत्वाची गरज – रोशन खोब्रागडे

**दैनिक युवक आधार**
**भावेश धंधुकीया/ भंडारा जिल्हा प्रतिनिधी** : नेपाळमध्ये अलीकडे घडत असलेल्या धाडसी आणि परिवर्तनशील राजकीय घडामोडींनी संपूर्ण दक्षिण आशियाचे लक्ष वेधले असताना, भारतातही आता युवा नेतृत्वाला संधी देण्याची वेळ आली आहे, असे आक्रमक मत सामाजिक कार्यकर्ते रोशन खोब्रागडे यांनी व्यक्त केले आहे.

खोब्रागडे म्हणाले की, नेपाळमध्ये पारंपरिक आणि जुनी राजकीय पद्धत बाजूला सारत नव्या, सुशिक्षित आणि धाडसी तरुणांना नेतृत्वाची संधी दिली जात आहे. तेथील नेते 'व्हीआयपी संस्कृती' मोडीत काढत थेट जनतेत मिसळत आहेत, निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता आणत आहेत आणि प्रशासन अधिक लोकाभिमुख करत आहेत.



"हेच खरे लोकशाहीचे स्वरूप आहे," असे त्यांनी ठामपणे सांगितले.भारताच्या संदर्भात बोलताना त्यांनी सध्याच्या राजकीय व्यवस्थेवर जोरदार टीका केली. "आपल्या देशात अजूनही काही मोजक्याच लोकांच्या हातात सत्ता केंद्रीत आहे. दशकानुदशके तेच चेहरे, तेच आश्वासने आणि तेच अपयश दिसत आहे.

निवडणुकीच्या काळात मोठमोठ्या घोषणा केल्या जातात; मात्र निवडून आल्यानंतर जनतेला विसरले जाते," असा आरोप त्यांनी केला.ते पुढे म्हणाले की, "युवकांना फक्त पक्षाचे झेंडे उचलण्यासाठी आणि सभा भरण्यासाठी वापरले जाते. प्रत्यक्ष निर्णय प्रक्रियेत त्यांना स्थान दिले जात नाही. त्यामुळे बेरोजगारी, स्थलांतर आणि सामाजिक असंतोष वाढत आहे."नेपाळमधील उदाहरण देत खोब्रागडे यांनी स्पष्ट केले की, "जर एका छोट्या देशात एवढा मोठा बदल होऊ शकतो, तर भारतात का नाही? इथल्या तरुणांमध्ये क्षमता आहे, फक्त संधी देण्याची गरज आहे."

शेवटी त्यांनी युवकांना थेट आवाहन केले की, "मोबाईल आणि सोशल मीडियापुरते मर्यादित न राहता रस्त्यावर या, प्रश्न विचारा आणि नेतृत्व स्वतः घ्या. अन्यथा जुनीच व्यवस्था आपल्यावर राज्य करत राहील."

# गझलसम्राट पंडित भीमराव पांचाळे यांचा नागरी सत्कार; अमृत महोत्सव उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे/ विदर्भ संपादिका** मराठी गझल विश्वातील अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेले गझलसम्राट पंडित भीमराव पांचाळे यांच्या ७५ वा वाढदिवस व अमृत महोत्सवानिमित्त भव्य नागरी सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी सर्व मान्यवरांचा शाल, श्रीफळ व ग्रामगीता देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला अमरावती जिल्ह्यातील सर्व आमदार, श्री संजय खोडके सौ सुलभा खोडके ,प्रवीण तायडे श्री राजेश वानखडे, श्री केवल रामजी काळे ,खासदार श्री बळवंत भाऊ वानखडे, अमरावती जिल्ह्याचे प्रथम नागरिक अमरावती जिल्हा नगराध्यक्ष श्री तेजवानी जी तसेच जिल्हाधिकारी आशिष येरेकर व पोलीस आयुक्त श्री ओला साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही वेळ काढून उपस्थिती लावत कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कार्यक्रमाची प्रस्तावना लोकमत १८ चे जिल्हा प्रतिनिधी प्रा. संजय शिंदे यांनी केली. यावेळी पंडित भीमराव पांचाळे यांच्या संगीत प्रवासावर आधारित विशेष चित्रफीत सादर करण्यात आली.

गावातील सामान्य कुटुंबातून पुढे आलेले भीमराव पांचाळे यांनी आपल्या कलेच्या जोरावर केवळ अमरावती किंवा महाराष्ट्रातच नव्हे, तर देश-विदेशातील तब्बल २२ देशांमध्ये मराठी गझलचा ठसा उमटवला आहे. गेल्या पाच दशकांपासून त्यांनी आपल्या सुरेल आवाजाने गझल रसिकांना मंत्रमुग्ध केले आहे.त्यांच्या कलेचा गौरव म्हणून त्यांना



लता मंगेशकर पुरस्कार तसेच राज्य सांस्कृतिक पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे. मराठी गझल विश्वात कवी सुरेश भट आणि पंडित भीमराव पांचाळे ही जोडी विशेष मानली जाते. कवी सुरेश भटानंतर जर कोणी गझल पूर्ण जनसामान्यांच्या मनामना मधे ठसवली असेल तर ते आमचे भीमरावजी पांचाळे सर.वडील गुलाबराव आणि आई लक्ष्मीबाई यांच्या संस्कारातून त्यांना संगीताची प्रेरणा मिळाली. अमरावतीतील ज्ञानमाता विद्यालयात शिक्षण घेत असताना त्यांनी पंडित एकनाथ कुलकर्णी यांच्याकडे संगीताचे धडे घेतले. राजकमल चौकात कवी सुरेश भट यांची भेट झाल्यानंतर त्यांच्या आयुष्याला नवे वळण मिळाले आणि मराठी गझलवर त्यांचे प्रेम दृढ झाले.

अमरावती, अकोला ते मुंबई असा प्रवास करत त्यांनी गझलला नवे आयाम दिले. त्यांच्या यशामागे सौ. गीता ताई पांचाळे यांचे मोठे योगदान असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. कार्यक्रमात पालकमंत्री बावनकुळे यांनी अमरावती येथे 'सुरेश भट सभागृह' आणि 'गझल गुरुकुल' उभारण्याचे आश्वासन दिले. तसेच नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.या भव्य सोहळ्याने अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात एक संस्मरणीय ठसा उमटवला.


महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री श्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी सई पांचाळे यांच्या 75 व्या वाढदिवसानिमित्त अवधीमध्ये सुरेश भट सभागृह बनवण्याचे आणि गझल गुरुकुल उभारण्याचे आश्वासन दिले आणि ते पूर्ण करण्यास कटीबद्ध असल्याचे सांगितले

# किसान कन्सलटन्सी अँन्ड सॉईल टेस्टिंग प्रा .लि .व शेतकरी संघटनेच्या वतीने अंभोरा येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी / मारुती सत्रे** : आष्टी तालुक्यातील अंभोरा येथे किसान कन्सल्टन्सी अँन्ड सॉईल टेस्टिंग प्रा.लि.या नामांकित कंपनीच्या वतीने संत्रा व मोसंबी फळबाग शेतकऱ्यांसाठी एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते,

संत्रा पिक प्रमुख मार्गदर्शन गौरव तायवडे डायरेक्टर किसान कन्सल्टन्सी मोर्शी

कार्यक्रमाचे अध्यक्ष सुभाष खाकाळ माजी पंचायती समिती सदस्य प्रमुख पाहुणे सागर आमले सरपंच अंभोरा श्री कालिदास आपेट शेतकरी संघटना कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य आज मोदीं शेख जिल्हाध्यक्ष शेतकरी संघटना बीड गोरख तरटे साहेब तालुका कृषी अधिकारी आष्टी प्रमुख मार्गदर्शक श्री गौरव तायवाडे संत्रा पिक मार्गदर्शक बाळासाहेब गुंजाळ संचालक हायटेक फार्म नर्सरी दैठणे गुंजाळ राधाकिसन गर्दे शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष धारूरश्री प्रमोद खुटाळे साहेब मंडळ कृषी अधिकारी धानोरा सुधीर भद्रे सामाजिक कार्यकर्ते व माजी पंचायत समिती सदस्य बाळासाहेब गुंड युवा आघाडी अध्यक्ष शेतकरी संघटना संतोष गुंड तालुका अध्यक्ष शेतकरी संघटना आष्टी साई पोकळे संत्रा व्यापारी पत्रकार रहमान सय्यद दैनिक सिटीजन बीड मारुती सत्रे जिल्हा प्रतिनिधी युवक आधार सागर दळवी पत्रकार दक्षवेद**कार्यक्रमाचे आयोजन** शेतकरी संघटना आष्टी शेतकरी संघटना आष्टी आष्टी ग्रामपंचायत कार्यालय अंभोरा किसान कन्सल्टन्सी अँड सोईल टेस्टिंग प्रायव्हेट लिमिटेड



मोर्शी.यावेळी शेतीतज्ञांनी माती परीक्षण केल्यानंतर होणारे फायदे व तोटे समजून सांगितले,**माती परीक्षण विषयी माहिती**

माती परीक्षणाचे (Soil Testing) मुख्य फायदे खालीलप्रमाणे आहेत, जे शाश्वत शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत:

पोषक घटकांची अचूक माहिती: जमिनीत उपलब्ध नत्र, स्फुरद, पालाश आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांची अचूक पातळी समजते.

योग्य खत नियोजन: जमिनीच्या अहवालानुसार पिकाला आवश्यक तितकेच खत देता येते, ज्यामुळे अनावश्यक खर्च वाचतो आणि पिकाची वाढ चांगली होते.

सुपीकता टिकवणे: जमिनीचा पोत आणि सेंद्रिय कर्ब सुधारून दीर्घकाळ जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यास मदत होते.

pH आणि क्षारता नियंत्रण: जमिनीचा सामू (pH) आणि क्षारता (Salinity/EC) समजल्यामुळे, आम्लारी किंवा चोपण जमीन सुधारणे सोपे होते.

योग्य पीक निवड: जमिनीच्या गुणधर्मानुसार कोणता पिकाला जास्त नफा मिळेल, हे ठरवता येते.

**माती परीक्षण का करावे?**

यामुळे अनावश्यक खतांचा वापर कमी होऊन उत्पादन खर्च वाचतो, शाश्वत शेतीला प्रोत्साहन मिळते आणि जमिनीचे आरोग्य दीर्घकाळ अबाधित राहते.

मातीच्या \(pH\) म्हणजे मातीमधील आम्लता (Acidity) किंवा क्षारता (Alkalinity) मोजण्याचे एक परिमाण आहे.


\(pH\) मापन \(0\) ते \(14\) च्या स्केलवर केले जाते. \(pH=7\) असल्यास माती तटस्थ (Neutral) असते. \(pH<7\) असल्यास माती आम्लीय (Acidic) असते आणि \(pH>7\) असल्यास माती क्षारीय (Alkaline) असते. बहुतेक पिकांसाठी मातीचा योग्य \(pH\) \(6.5\) ते \(7.5\) दरम्यान असतो.मातीचा pH (Soil pH) म्हणजे मातीची आम्लता (Acidity) किंवा क्षारता (Alkalinity) मोजण्याचे परिमाण, जे 0 ते 14 या स्केलवर मोजले जाते. हे मातीतील पोषक द्रव्ये पिकांना उपलब्ध होण्यास मदत करते. तटस्थ (Neutral) मातीचा pH ७ असतो, ७ पेक्षा कमी आम्लीय आणि जास्त क्षारीय मानली जाते. पिकांसाठी योग्य pH साधारण ६.५ ते ७.५ असतो [१, २, ४, ६].

**मातीचा pH समजून घेताना महत्त्वाचे मुद्दे:**

pH स्केल: 0 (अत्यंत आम्लीय) ते 14 (अत्यंत क्षारीय) [१].तटस्थ (Neutral): pH = 7 (बहुतेक पिकांसाठी उत्तम) [२].आम्लीय (Acidic): pH 7 पेक्षा कमी (उदा. काळी माती, जास्त पाऊस पडणाऱ्या भागातील माती) [३]. क्षारीय (Alkaline): pH 7 पेक्षा जास्त (उदा. कोरड्या भागातील, कॅल्शियमयुक्त माती) [१].पिकांसाठी योग्य pH: ६.५ ते ७.५ च्या दरम्यान (६.० ते ७.५ ची श्रेणी उत्तम अन्नद्रव्य उपलब्धतेसाठी चांगली मानली जाते)माती परीक्षणामुळे जमिनीची सुपीकता आणि पिकांची समृद्धी वाढते.

# तेजस्वी फाउंडेशनचा गौरव सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**ठाणे प्रतिनिधी :** तेजस्वी फाउंडेशनतर्फे आयोजित गौरव पुरस्कार सोहळा नुकताच ठाणे मराठी ग्रंथ संग्रहालयात पार पडला. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला. तेजस्वी फाउंडेशन ही संस्था मागच्या दशकभरापासून सामाजिक उपक्रम राबवणारी संस्था आहे. संस्थेचे संस्थापक प्रा प्रज्ञा पंडित आणि प्रा मनिष पंडित ठाणे, मुंबई व महाराष्ट्रातील अनेक वृद्धाश्रम, अनाथाश्रम, आदिवासी भागातील शाळा, अन्नछत्र केंद्र येथे सातत्याने अन्नदान, श्रमदान, धान्य दान, शैक्षणिक दान, वस्त्र दान आणि अशा प्रकारच्या अनेक माध्यमातून आपली सामाजिक बांधिलकी आणि कर्तव्य पार पाडत आहेत.




याच उपक्रमांतर्गत समाजातील विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मान्यवरांचा सन्मान दरवर्षी संस्थेतर्फे केले जातात. यंदाच्या या सोहळ्यात डॉ बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार, महात्मा ज्योतिबा फुले पुरस्कार, लोकमान्य टिळक पुरस्कार, सावित्रीबाई फुले पुरस्कार, राजर्षी शाहू महाराज पुरस्कार, कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार, पु. ल. देशपांडे पुरस्कार* तसेच कुसुमाग्रज पुरस्कार प्रदान करून विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान व्यक्तींना कार्यक्रमाच्या अध्यक्षा लेखिका कवयित्री वक्त्या पूर्णिमा शिंदे, लेखक बाबुराव शिंदे, लेखक श्रीनिवास सप्रे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

पुरस्कारप्राप्त मानकऱ्यांमध्ये निशा शेलार, वैशाली हजारे, चंद्रकांत गोविंद पाटील, विनोद अच्युत बांदोडकर, मिलिंद कांबळे चिंचवलकर, डॉ. आकाश वानखेडे, राजीव प्रधान, कनोजे काळूदास देवराम, संजय नागावकर, सुदाम शांताराम अहिरराव, प्रमोद नरसिंह सूर्यवंशी, अशोक कांबळे, सुदत्ता सुधीर साळवे तसेच प्रकाश लक्ष्मण पालांडे यांचा समावेश होता.

कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, साहित्यप्रेमी व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. सन्मानित व्यक्तींनी आपल्या कार्यातून समाजासाठी अधिक योगदान देण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रभावी व नेटके सूत्रसंचालन डिजिटल गुरु मनीष पंडित यांनी केले. त्यांच्या ओघवत्या शैलीमुळे कार्यक्रम अधिक रंगतदार झाला.

# लिंबागणेश येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती निमित्त अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी):** बीड तालुक्यातील बालाघाटावरील लिंबागणेश येथे अखंड क्रांतीचे जनक, सत्यशोधक समाजाचे संस्थापक व समाज सुधारक क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंती निमित्त ग्राम पंचायत कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बाळासाहेब जाधव होते. या वेळी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व श्रीफळ फोडून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन रमेश गायकवाड यांनी केले. या वेळी माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, साहेबराव निर्मळ, ॲड.गणेश वाणी, ग्राम पंचायत सदस्य दामोदर थोरात, रमेश गायकवाड, जीवन मुळे, सुरेश निर्मळ, मोहनराव कोटुळे, महादेव वाणी, ज्ञानेश्वर कुदळे, संजय



पावले, खंडू वाणी, श्रीराम तागड, भीमराव बोराटे, सुभाष मुळे, मल्हारी आबदार, पोपट निर्मळ सह आदी उपस्थित होते.

**"महात्मा फुले यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी" :– डॉ.गणेश ढवळे**

या वेळी बोलताना सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव केला."विद्येविना मती गेली, मतिविना निती गेली..." हा महात्मा फुले यांचा विचार उद्धृत करत त्यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य महात्मा फुले यांनी केले असून, स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून समाजाला नवी दिशा दिली, असे त्यांनी सांगितले. तसेच सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने मुलींसाठी शाळा सुरू करून शिक्षण सर्वांसाठी खुले केले. अज्ञानाचा अंधार दूर करून समाज सक्षम बनवण्याचा त्यांचा विचार आज ही मार्गदर्शक आहे, असे ही त्यांनी नमूद केले. महात्मा फुले यांनी सत्यशोधक विचारातून समाजाला जागृत करत अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. धर्माच्या नावाने चालणाऱ्या अनिष्ट रूढी-परंपरांना विरोध करून "माणुसकी हाच खरा धर्म" असल्याचा संदेश त्यांनी दिला. शेतकरी हा देशाचा कणा असून तो अन्याय, कर्जबाजारीपणा व सामाजिक उपेक्षेखाली दबला जात असल्याचे वास्तव ही त्यांनी मांडले, असे डॉ.गणेश ढवळे यांनी सांगितले. सामाजिक समतेसाठी आयुष्यभर झटणारे महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य आज ही समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे मत या वेळी व्यक्त करण्यात आले.